दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -९८ | शनिवार दि.१३ डिसेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-98 | Saturday, Dt.13 December 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंती बॅनर्स वरुन पंकजाताई गायब..?

## जाणताराजा शरदचंद्र पवार साहेबांच्या वाढदिवसाचा बीडमध्ये दिग्गजांना विसर..!




बीड /विशेष प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे बुलंद नेतृत्व, सामान्य जनतेचा आवाज लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पश्चात बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात त्यांची जयंती तितक्याच उत्साहामध्ये कार्यकर्ते आजही साजरे करत आहेत आणि करत राहतील. मात्र यावर्षी अपवाद वगळता मुंडे साहेबांच्या जयंती बॅनर्स वरून साहेबांच्या राजकीय वारसदार पंकजाताई मुंडे यांचे फोटो कार्यकर्त्यांनी घेतले नाहीत. याबद्दल मात्र राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे.दुसरीकडे राजकारणातले जाणते राजे म्हणून ज्यांची देशात ओळख आहे असे कणखर नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक शरदचंद्र पवार साहेबांच्या वाढदिवसाचा अपवाद वगळता मात्र बीड जिल्ह्यातील लोकनेत्यांना आणि पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना विसर पडल्याचे चित्र दिसून आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

पुरोगामी बीड जिल्ह्यामध्ये हिंदुत्ववादी भाजपाचे कमळ फुलवण्यामध्ये भाजप नेते गोपीनाथराव मुंडे खऱ्या अर्थाने यशस्वी झाले. त्यामुळेच बीड जिल्ह्याला भाजपाचा बालेकिल्ला करण्यात त्यांना यश मिळाले. मूठभर लोकांचा भाजपा अशी ज्या पक्षाची ओळख होती त्या पक्षाला वाड्या तांड्या, वस्त्यावर, सामान्य जनतेचा पक्ष म्हणून ज्यांनी मान्यता मिळवली त्यामध्ये गोपीनाथराव मुंडे यांचे महाराष्ट्रामध्ये विशेष योगदान राहिले यात तीळमात्र शंका नाही. मुंडे साहेब ज्यांना ठरवतील त्यांच्याच कपाळी गुलाल लागेल अशी राजकीय परिस्थिती त्यांनी बीड जिल्हासह महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यामध्ये निर्माण केली होती. त्यामुळेच ते सामान्य जनतेचे गळ्यातील ताईत आणि विविध पक्षातील राजकीय नेत्यांसाठी धडकी भरवणारे नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. दुर्दैवाने त्यांच्या राजकीय आयुष्यातील उभारीचे आणि बीड जिल्ह्याच्या विकासाचे दार उघडले जात असतानाच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. यामुळे मुंडे कुटुंबीयांचा बीड जिल्ह्यासह किंबहुना महाराष्ट्राची मोठी हानी झाली. आजही मुंडे साहेबांवर निस्वार्थ प्रेम असणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या लाखोंच्या घरात आहे ती पुढेही कायम राहील. साहेबांना जाऊन अकरा वर्षे झाली त्यांच्या पश्चात बारावी जयंती एका डोळ्यात अश्रू आणि एका डोळ्यात आनंदाश्रू ठेवून कार्यकर्त्यांनी अभिवादन करत साजरी केली. गोपीनाथ गडावर मुंडे साहेबांवर प्रेम करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांनी समाधीवर डोकं टेकवत आपल्या नेत्याचे दर्शन घेत अभिवादन केले. मात्र दुसरीकडे बीड जिल्ह्यात दरवर्षी मुंडे साहेबांच्या स्मरणार्थ लावण्यात येणारे बॅनर्स, विविध वृत्तवाहिन्या आणि वृत्तपत्रांना देण्यात येणाऱ्या जाहिरातींचे प्रमाण अत्यल्प झाले आणि जे बॅनर्स किंवा जाहिराती प्रकाशित झाल्या त्यातील बहुतांश बॅनर्स वरून साहेबांच्या राजकीय वारसदार पंकजाताई मुंडे यांचे फोटो गायब झाल्याचे चित्र अनेकांच्या मनाला खटकत होते. यावर मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आत्मचिंतन करण्याची खरी गरज आहे. जेव्हा आपल्या नेत्याबद्दल मनामध्ये भावना राहत नाही तेव्हा अशी परिस्थिती निर्माण होते.मग अशी परिस्थिती का निर्माण होत आहे ? यावर आत्मचिंतन करणे काळाची गरज झाली आहे. अन्यथा भविष्यात राजकीय परिस्थिती जन-आधाराशिवाय कठीण होईल.त्यावेळी कोणताही पक्ष आणि नेता साथ देणार नाही. ती परिस्थिती दुर्दैवाने ही

(उर्वरीत पान २ वर)

### महबूब शेख एकमेव निष्ठावंत का..?

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक शरदचंद्र पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त प्रसिद्धी माध्यमातून आणि बॅनर्स लावून शुभेच्छा देणाऱ्या मध्ये पवार साहेबांचे एकनिष्ठ म्हणून ज्या तरुण बीड जिल्ह्यातील युवकाचे नाव पुढे आले ते एकमेव महबूब शेख एवढेच निष्ठावंत राहिले आहेत का ? बाकी सर्व फक्त लाभार्थी म्हणून ठरले आहेत का ? असा प्रश्न साहेबांच्या वाढदिवसाचा विसर पडलेल्या नेत्यांनी आणि प्रमुख लाभार्थी पदाधिकाऱ्यांनी आत्मचिंतन करून करावा अशीच वेळ आली आहे. असं म्हटलं तर वावगं ठरू नये.

## महाराष्ट्र राजकीय सुसंस्कृततेचा लौकिक जपणाऱ्या उत्तुंग नेतृत्वाला मुकला.....!



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

#### राजकारणातील सभ्य आणि अभ्यासू व्यक्तिमत्व गमावले - पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोंसले

नागपूर - काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, लोकसभेचे माजी अध्यक्ष, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने देशाच्या राजकारणातील एक सभ्य,सुसंस्कृत आणि अभ्यासू व्यक्तिमत्व आपण गमावले आहे, अशी शोकसंवेदना सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोंसले यांनी व्यक्त केली आहे. आपल्या शोक संदेशात शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणतात की, शिवराज पाटील चाकूरकर यांनी देशाच्या तसेच राज्याच्या राजकारणात,समाजकारणात लोकसेवेचा नवा आदर्श निर्माण केला होता. अत्यांत मुळे साधेपणा मुळे आणि नैतिक मूल्यांच्या जपनुकीने त्यांनी आपली वेगळीच ओळख निर्माण केली होती.

प्रचंड अभ्यास,मराठी,इंग्रजी ,हिंदी भाषेवर असलेले प्रभुत्व तसेच प्रभावी मांडणी हे शिवराज पाटील चाकूरकर यांच्या राजकीय प्रवासाचे विशेष गुण राहीले त्याच्या निधनाने एक अभ्यासू , लोकनेत्याला आपन मुकलो आहोत अश्या भावना पालकमंत्री मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी व्यक्त केल्या.

लातूर ।प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्राच्या शालीनता, सुसंस्कृततेचा लौकिक जपणारे आणि तो राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पोहचविणारे नेतृत्व म्हणून ज्येष्ठ नेते शिवराज पाटील- चाकूरकर सदैव स्मरणात राहतील, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय मंत्री शिवराज पाटील - चाकूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांच्या निधनामुळे राजकारण-समाजकारणातील उत्तुंग अशा मार्गदर्शक नेतृत्वाला मुकलो आहोत, अशी शोकभावना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, चाकूरकर यांनी लातूरचे नगराध्यक्ष म्हणून राजकारणात पाऊल टाकले. महाराष्ट्राच्या विधानसभेचे उपाध्यक्ष, अध्यक्ष, संसदेच्या अनेकविध समित्यांचे सदस्य,आणि पुढे केंद्रातील विविध खात्यांचे मंत्री आणि लोकसभा अध्यक्ष, पंजाबचे राज्यपाल अशी त्यांची कारकिर्द राहीली. लोकसभा सदस्य म्हणून ते सातवेळा निवडून आले होते. लोकसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी संसदेशी निगडित अनेक अभिनव उपक्रमांना आवर्जून चालना दिली. चाकूरकर यांचा वकील म्हणून संविधानाचा गाढा अभ्यास होता. त्यातूनच त्यांनी लोकसभेतील संसदीय कार्य प्रणाली आणखी बळकट केली. तत्वनिष्ठ, अभ्यासपूर्ण आणि ठामपणे मांडणी करणारे नेतृत्व म्हणून त्यांना देशाच्या राजकारणात आदराचे स्थान होते. चाकूरकर यांच्या निधनामुळे राजकारण- समाजाकारणात सभ्यता, सुसंस्कृतता जपणारे, लोकशाहीवर गाढा विश्वास असणाऱ्या ज्येष्ठ नेतृत्वाला महाराष्ट्र सुपुत्राला आपण मुकलो आहोत. या क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, असे मानतो. चाकूरकर कुटुंबीय आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर आघात झाला आहे. या सर्वांच्या दु:खात आम्ही सहभागी असून, ईश्वराने त्यांना हा आघात सहन करण्याची ताकद द्यावी अशी प्रार्थना करतो आणि ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

ज्येष्ठ नेते देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी काशीचे जगद्गुरु तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राच्या पर्यटन मंत्री पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्यासह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून अखेरचा निरोप दिला.

सुसंस्कृत, अभ्यासू व्यक्तिमत्व गमावले - उपमुख्यमंत्री अजित पवार

नागपूर - काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, लोकसभेचे माजी अध्यक्ष, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने देशाच्या राजकारणातील एक सभ्य,सुसंस्कृत आणि अभ्यासू व्यक्तिमत्व आपण गमावले आहे, अशी शोकसंवेदना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली आहे.

राजकीय क्षेत्रात पोठी पोकळी निर्माण झाली - सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील

लातूर- माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने राजकीय क्षेत्रात पोठी पोकळी निर्माण झाली आहे. अशा भावना राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केल्या.

साहेबांचे मला राजकीय आणि सामाजिक जीवनात कायमच मार्गदर्शन लाभले. राजकीय क्षेत्रातील यशस्वी वाटचालीत त्यांनी मोलाची साथ दिली.सुमारे सहा दशकांचा संसदीय आणि प्रशासकीय अनुभव, विविध मंत्रालयातील कामकाज आणि लोकसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे

## गोपीनाथगडाची निर्मिती वंचित, उपेक्षितांसाठीच; त्यांच्याच आदर्शावर माझी वाटचाल - ना.पंकजाताई मुंडे

### लोकनेत्याच्या अभिवादनासाठी गोपीनाथगडावर उसळली अलोट गर्दी
### रक्तदान शिबीर, गरजुंना मदत, अन्नदानासह विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन



परळी ।प्रतिनिधी

गोपीनाथगडाची उभारणी हीच मुळात लोकनेते मुंडे साहेबांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाला नतमस्तक होता यावे, त्यांचे सुख-दु:ख त्याला मस्तक टेकून सांगता यावे यासाठी केलेली आहे. पृथ्वीतलावरील एकमेव असा हा गड आहे जो एका लेकीने आपल्या वडीलांच्या स्मृतीनिमित्त उभा केला आहे. वास्तविक पाहता हा गड मी उभा केलेला नाही तर ईश्वरानेच हे घडवून आणलेले आहे. मुंडे साहेबांनी आयुष्यातला क्षण न् क्षण वंचित, पिडीतांसाठी वेचला आहे, त्यांच्याच आदर्शावर माझी वाटचाल आहे अशा शब्दात राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

लोकनेते मुंडे साहेब यांची जयंती आज गोपीनाथ गडावर विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली, त्यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.

(उर्वरीत पान २ वर)

### कामाचं आणि अधिकाराचं विकेंद्रीकरण

आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संदेश आहे की, प्रत्येक जनसेवेच्या कामाचं विकेंद्रीकरण झालं पाहिजे याच पध्दतीने अधिकारांचेही विकेंद्रीकरण केलं पाहिजे. हीच बाब लक्षात घेवुन मी देखील काम आणि अधिकार यांचे विकेंद्रीकरण करण्याचा प्रयत्न करत आहे. या विकेंद्रीकरणातून जनतेच्या न्यायाची भूमिका निश्चित पार पडणार आहे. गोपीनाथगडावर दशकभरात आपण भव्य-दिव्य कार्यक्रम केले मात्र गेल्या वर्षापासून मी प्रत्येकाने मुंडे साहेबांना अभिप्रेत अशा सामाजिक उपक्रमांनी जयंती साजरी करावी अशा पध्दतीचा संदेश देत एक प्रकारे विकेंद्रीकरणाची पध्दत सुरू केली. त्याला राज्यभरातून प्रतिसादही मिळाला आहे. यावर्षीही त्याच पध्दतीने लोकांनी ऊसाच्या फडात असो, दवाखान्यातून असो, अनाथ आश्रमातून असो किंवा गरजवंतांना मदत करणे असो अशा विविध सामाजिक सेवा उपक्रम राबवुन जयंती साजरी केली. मुंडे साहेबांना अभिप्रेत अशी सामाजिक न्यायाची भूमिक यातुन निर्माण होते याचा खरोखरीच आनंद वाटतो असे पंकजाताई म्हणाल्या.

### गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने गरजुंना ब्लँकेट

मुंडे साहेबांच्या जयंतीचे औचित्य साधुन गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने वैद्यनाथ मंदिर येथे गोरगरीब व गरजुंना कडक हिवाळा लक्षात घेवुन उबदार ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. प्रतिष्ठानच्या वतीने प्रितेश तोतला, नितीन समशेट्टी, आश्विन मोगरकर, अनिश अग्रवाल, माऊली आघाव हे यावेळी उपस्थित होते.



बीड ।प्रतिनिधी

पालीच्या घाटामध्ये डिझेल टँकर आणि कंटेनरचा भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये चालकाचा जळून जागीच मृत्यू पावल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेनंतर सोलापूर संभाजीनगर या महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली. घटनास्थळी बघायची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक कोंडीला मार्ग दिला आणि पुढील अनर्थ टाळण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


## संपादकीय

# वंचितांचा आवाज निमाला!

डॉ. बाबा आढाव केवळ व्यक्ती नव्हती. गेली सात दशकं महाराष्ट्राच्या कोणत्याही कानाकोपऱ्यांत, जिथे अन्याय होईल तिथे धावून जाणारा, समता आणि न्यायासाठी झगडणारा, आपल्या असेल त्या सामर्थ्यानिशी (वयाच्या कोणत्याही टप्प्यावर) प्रस्थापित व्यवस्थेशी दोन हात करायला तयार असणारा, विद्वानांबरोबर विचारसरणीचे वाद घालता घालता सहजपणे कष्टकऱ्यांबरोबर त्यांच्याच भाषेत संवाद साधणारा, सनदशीर मार्गावर गाढ निष्ठा असणारा, सत्ताधारी कोणीही असोत; त्यांच्यावर नैतिक धाक असलेला आवाज होता. हा आवाज परवा रात्री, वयाच्या ९४ व्या वर्षी पुण्यात निमाला. अस्पृश्यतेविरोधात महाराष्ट्रात गेली दीड-दोनशे वर्षे लढा सुरू आहे. पण, अस्पृश्यतेच्या शेवटच्या अवशेषावर शेवटचा घाव घालणारा अस्पृश्योद्धारक म्हणून इतिहासाला डॉ. बाबा आढाव यांचीच नोंद ठेवावी लागेल. आजोळच्या सत्यशोधक आणि घरातल्या वारकरी संस्कारांतून बाबांनी वयाच्या २३ व्या वर्षी सार्वजनिक जीवनाकडे आपली पावलं वळवली. मिश्र वैद्यकीचं शिक्षण घेतल्यानंतर १९५३ मध्ये पुण्यात हडपसरला स्वतःचा दवाखाना सुरू केला. पण, येणाऱ्या रुग्णांच्या आजारांचं निदान करताना रुग्णांचे आजार केवळ शारीरिक नाहीत, त्यांच्या शारीरिक व्याधींनाही कारणीभूत इथल्या वेगवेगळ्या शोषण व्यवस्था आहेत, हे लक्षात आल्यानंतर केवळ वैद्यकीत त्यांचं मन रमेना. १९६० मध्ये दादा गुजर आणि अन्य काही सहकाऱ्यांच्या साथीने त्यांनी 'महाराष्ट्र आरोग्य मंडळा'ची स्थापना केली. स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन आणि त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ या तीनही जनआंदोलनांत त्यांचा सक्रिय सहभाग होता. 'स्वातंत्र्य चळवळीतील मूल्यविचारांनी राष्ट्र निर्मितीसाठी तळागाळात काम करणारा कार्यकर्ता' ही ओळख त्यांनी किमान सात दशकं अभिन्न राखली. कुठलीही वैचारिक तडजोड न करता, एका पैशाच्या गैरव्यवहाराचा संशयही कोणाला घेता येणार नाही, इतक्या स्वच्छ, निष्कलंक सार्वजनिक आयुष्याचा आदर्श बाबांनी वर्तमान काळात समाजासमोर ठेवला!

बाबा आढाव यांनी राजकारणाची वाट धरलीच नाही, असं नाही. पुणे महापालिकेत नगरसेवक म्हणून ते निवडूनही गेले होते. पण, पुणे महापालिकेचे तेव्हाचे कारभारी झोपडपट्ट्यांच्या सुधारणांसाठी संवेदनशील नाहीत, हे पाहून त्या भ्रमनिरासातून त्यांनी पालिकेच्या राजकारणाकडे पाठ फिरवली. त्यानंतर लोकाग्रहास्तव दोनदा लोकसभेची निवडणूकही लढवली. पण, निवडणुकीच्या बेरीज-वजाबाकीत, सत्तेच्या गणितात सामान्यांचे प्रश्न प्रामाणिक प्राधान्याचे नसतात; अशा राजकारणासाठी ज्या तडजोडी कराव्या लागतात, त्यातून सामाजिक आग्रहही काही प्रमाणात सौम्य करावे लागतात हे पाहिल्यानंतर त्यांनी त्या राजकारणाकडेच कायमची पाठ फिरवली आणि आयुष्यभर 'संसदबाह्य राजकारणा'चा आग्रह धरला. 'संसदीय की संसदबाह्य राजकारण?' हा त्याकाळी समाजवाद्यांमध्ये मोठा वादाचा विषय होता. युवक क्रांती दलासह त्या काळात सर्वोच्च शिखरावर असलेल्या सर्व डाव्या संघटनांत हा वाद टोकाला गेला. त्यातून चळवळीची शक्ती विभागली. 'संसदबाह्य राजकारणा'चा अतिरेकी आग्रह धरल्याचा आरोप बाबांवर झाला. त्यातून ते समाजवादी वर्तुळातही बाजूला पडले! पण, प्रामाणिक भूमिका आणि प्रभावी, तर्कशुद्ध मांडणीमुळे त्या काळच्या डाव्या चळवळीतील युवकांवर बाबांच्याच विचारांचा प्रभाव राहिला. समाजवादी आणि कम्युनिस्ट या दोन्ही पक्षांची त्यांच्याच विचारांच्या जनसंघटनांशी नाळ तुटली आणि त्यामुळे या दोन्ही विचारांच्या पक्षांचा कालांतराने ऱ्हास झाला, असं मानणारा मोठा गट आजही आहे. त्यात तथ्यही आहे. पण, बाबांपुरतं बोलायचं, तर त्यांनी आपल्या आयुष्यात ही सीमारेषा कसोशीने पाळली. जनसमूहाचा व्यापक पाठिंबा मिळाल्यानंतर, असंघटित क्षेत्रातील निर्णायक ताकद हाती आल्यानंतरही आपल्या भूमिकेत बदल करण्याचं त्यांच्या मनातही आलं नाही. उपेक्षित-वंचितांच्या जनचळवळींना त्यांनी स्वतःला बांधून घेतलं. अनेक चळवळींना जन्म दिला. वंचित-शोषितांच्या अनेक चळवळींचे, त्यांच्या संघटित ताकदीचे आणि त्यांच्याच आग्रहातून आलेल्या अनेक कायद्यांचे बाबा जन्मदाते आहेत. महात्मा जोतिबा-सावित्रीमाई फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची परंपरा डॉ. बाबा आढाव या नांवापाशी येऊन संपते.

# तडखेल गॅस स्फोटातील पीडित शेतकऱ्याला
## यादवराव देशमुखांकडून मदतीचा हात



देगलूर ।प्रतिनिधी

देगलूर तालुक्यातील तडखेल गावात ६ डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास घडलेल्या भीषण गॅस सिलेंडर स्फोटामुळे शेतकरी बाबू हनुमंत बत्तलवाड यांच्या कुटुंबाचे घर जळून खाक झाले. या दुर्घटनेत साडेसात लाख रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचे समजते. कुटुंब सध्या उघड्यावर पडलेले असून त्यांना त्वरित मदतीची गरज होती.

या परिस्थितीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती यादवराव देशमुख आणि त्यांच्या शिष्टमंडळाने पीडित कुटुंबाला अन्नधान्य आणि आर्थिक सहाय्य दिले. तसेच, उपस्थित मान्यवरांच्या वतीने कुटुंबाला धीर देण्यात आला आणि शासन स्तरावर आवश्यक ती मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले गेले.

यावेळी. शिवाजी मामा कनकटे, माजी जिल्हा परिषद सदस्य; अवधूत भारती, माजी पंचायत समिती सदस्य; बालाजी पाटील ताटे अल्लापुरकर, दयानंद सूर्यवंशी, बाबुराव आकेमोड, कृषी उ. बाजार स. सदस्य; प्रकाश उमाकांतराव पाटील, सिद्दिकी शेख, मा. सरपंच; आनंदा दिंडे, माजी उपसरपंच; गणेश बंडगिलवार, माजी पोलीस पाटील; विश्वनाथ परणेकर, जाकीर अहमद हुसेन, अशोक भुरळे, सद्दाम सूर्यवंशी, नागनाथ चितळे, हुलाराम चितळे, प्रभू सावळे, लक्ष्मण दिंडे, वैजनाथ स्वामी, सयाजी आउलवार, बाबुराव कदम देविदास कांबळे सभापती यादवराव देशमुख यांनी पीडित कुटुंबासोबत संवाद साधत त्यांना धीर देत, यासोबतच प्रशासनाला देखील तातडीने मदत पुरवण्याचे विनंती केली.




# सशक्त महिला म्हणजे निरोगी समाज - प्राचार्य डॉ. संध्या आयसकर

बीड ।प्रतिनिधी


महिलांचे आरोग्य हे संपुर्ण कुटूंबासाठी आधार असतो. निरोगी महिला हे प्रगत भारताचे लक्षण असून संपुर्ण समाज सशक्त व निरोगी समाज बनवायचा असेल तर महिलांचे आरोग्य आहार यावर संपुर्णपणे लक्ष देणे आवश्यक असून समाजाचा सर्वांगीन विकास करण्यासाठी महिलांच्या संपुर्ण विकासाकडे काळजीपुर्वक लक्ष देणे आवश्यक आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संध्या आयसकर यांनी सौ. के.एस.के. महाविद्यालयातील महिला कक्ष व अंतर्गत तक्रार निवार समिती यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानात व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली महिला कक्ष अंतर्गत तक्रार निवारण समिती सशक्त महिला व निरोगी समाज या विषयावर व्याख्यान कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर संचालक डॉ. खान ए.एस., उपप्राचार्य डॉ. काकडे एन.आर., पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर उपस्थित होते. याकार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. ज्योती क्षीरसागर, सुत्रसंचालन प्रा.डॉ. पल्लवी इरलापल्ले तर आभार प्रा. डॉ. दुष्यंता रामटेके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. संध्या जोगदंड,

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त
## आज भाजप जिल्हा कार्यालयात रक्तदान शिबीर
### मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - शंकर देशमुख

आष्टी ।प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथजी मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्ताने बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हा कार्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असुन मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन ! माणूस किती मोठा असतो हे त्याच्या पदाने नाही, तर त्याच्या लोकांवरील प्रेमाने ठरते आणि गोपीनाथरावजी मुंडे साहेब हे त्याचे जिवंत उदाहरण होते. सामान्य कार्यकर्त्यांच्या हक्कांसाठी लढणारा नेता, शेतकऱ्यांच्या वेदना जाणणारा शेतकऱ्याचा मुलगा, आणि नेहमी





लोकांसाठी झटणारा खरा जननेता म्हणजे गोपीनाथ मुंडे साहेब अशा लोकनेत्याच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर आज शनिवार दि. १३ डिसेंबर रोजी भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित केले आहे. सकाळी १० वा. या रक्तदान शिबिराला प्रारंभ होणार असून भाजप जिल्हा कार्यालय नाट्यगृह रोड, चाणक्य पुरी बीड येथे शिबीर होणार आहे. लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेबांनी आपले आयुष्य लोकांची वंचिताची सेवा करण्यासाठी घातले असून त्यांच्या जयंतीनिमित्त लोकांना जीवनदान देणारे रक्तदान शिबीर महत्वाचे आहे. तरी जास्तीत जास्त कार्यकर्ते, पदाधिकारी नेते यांनी रक्तदान करावे व जनतेला ही रक्तदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे. आज बीड ब्लड बँके मधे रक्ताचा तुटवडा आहे. रक्तदान हीच लोकनेत्याला खरी श्रद्धांजली ठरेल असे आवाहन शंकर देशमुख यांनी केले आहे.

या शिबिरास बीड विधानसभा भाजप नेते योगेश क्षिरसागर, राज्य परिषद सदस्य विधिज्ञ सर्जेराव तांदळे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, शिवाजी मुंडे, अजय सवई, जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे, शांतीनाथ डोरले, अशोक लोढा, अदित्य सारडा, सौ. सारीका क्षिरसागर, इर्शाद भाई आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



# लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची वडवणी शहरात जयंती साजरी

वडवणी ।प्रतिनिधी

दिनांक. १२ /१२/२०२५ शुक्रवार रोजी वडवणी शहरातील लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या चौकात लोकनेते दिवंगत गोपीनाथराव मुंडे साहेब यांची जयंती सर्वप्रथम वडवणी नगरीचे उपनगराध्यक्ष बन्सीधर मुंडे यांनी . गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. त्याचबरोबर तालुक्यातील व परिसरातील अनेकांनी यावेळी स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. व झेंडा वंदन करून जयंती साजरी करण्यात आली.यावेळी प्रमुख उपस्थितीत रविंद्र मुंडे, योगेंद्र मुंडे , दिलीप तात्या मुंडे, नगरसेवक अरुण मुंडे, महादेव दादा उजगरे, पत्रकार शंकरराव झाडे,बालासाहेब चाटे, सर्जेराव तंटे, डॉ सतिश मुंडे, विकास मुंडे, विष्णू आंधळे,राजे भाऊ टकले, महादेव मुंडे, चोले भाऊ यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

# धोबी समाजाच्या विविध मागण्यांसाठी नागपूर येथे आंदोलनात सहभागी व्हा- नारायण जाधव

वडवणी ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील परिट धोबी समाजाच्या ज्वलंत मागण्या तात्काळ पूर्ण करण्यासाठी सरकारविरोधात नागपूर येथे अखिल भारतीय परिट धोबी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बालाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली धरणे आंदोलनास दि.८ डिसेंबर सोमवार रोजी सुरुवात झाली असून राज्यातील परिट धोबी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून लढा यशस्वी करावा असे आवाहन वडवणी परीट धोबी समाजाचे युवा पत्रकार नारायण जाधव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्रातील परीट धोबी समाज, महाराष्ट्र शासनाकडे, समाजाच्या मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. परंतू सरकारकडून दुर्लक्ष होत असल्याने सरकारच्या विरोधात बेमुदत साखळी धरणे प्रदर्शन नागपूर येथे करणार आहेत परीट धोबी समाजाच्या

मागण्या खालील प्रमाणे आहेत. महाराष्ट्रातील परीट धोबी समाजाला अनुसूचित जातीच्या सवलती मिळण्यासंबंधाने धोबी समाज पुनर्विलोकन समिती गठित करून डी. एम. भांडे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वे करण्यात आला. त्याचा अहवाल सरकारला सादर झाल्यानंतर महाराष्ट्र सरकारने सातत्याने चुकीची शिफारस केंद्राला केली. त्यामुळे परिट समाजाला न्याय मिळाला नाही. करिता योग्य शिफारस करून परीट धोबी




समाजाला अनुसूचित जातीच्या सवलती पूर्ववत देण्यात याव्यात, परीट धोबी समाज व तत्सम समाजासाठी अनेक वेळा घोषणा करूनही श्री. संत गाडगेबाबा आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित झाले नाही, ते तात्काळ स्थापन करून कार्यान्वित करावे व त्याला भरीव निधी देण्यात यावा. यासह अन्य मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे.

# युवा शास्त्रज्ञ रणजित राऊत यांची बोडखे प्रेसला सदिच्छा भेट

आष्टी ।प्रतिनिधी

योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे संशोधक म्हणून कार्यरत असलेले युवा शास्त्रज्ञ व जैवविविधता संशोधक रणजित रावसाहेब राऊत यांनी नुकतीच आष्टी शहरातील बोडखे प्रिंटिंग प्रेस आणि दैनिक झुंजारनेताच्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी उपसंपादक उत्तम बोडखे यांच्याशी विविध सामाजिक, संशोधन, पर्यावरण व ग्रामीण विकास विषयांवर चर्चा केली. बोडखे प्रिंटिंग प्रेसचे संचालक दत्ता बोडखे यांनी प्रेसमध्ये सुरू असलेल्या अत्याधुनिक मुद्रण तंत्रज्ञानाची व कामकाजाची माहिती राऊत यांना दिली. यावेळी पत्रकार उत्तम बोडखे यांनी राऊत यांचा पारंपरिक फेटा बांधून सत्कार केला आणि त्यांना दिपोत्सव २०२५ दिवाळी विशेषांक, अक्षरमित्र, शब्दगंध, नवरत्न, उत्तमोत्तम ही पुस्तके भेट म्हणून प्रदान केली.

चर्चेदरम्यान भगवान महाविद्यालय आष्टी येथे दरवर्षी उत्साहात साजरा होणारा गंगाई - बाबाजी महोत्सव याविषयीही सविस्तर माहिती देण्यात



आली. राऊत यांच्या सातत्यपूर्ण संशोधन प्रवासाची दखल घेत बोडखे परिवाराकडून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या सदिच्छा भेटीमुळे शैक्षणिक, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात परस्पर सहकार्याची नवीन दृष्टी उघडल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. यावेळी उपप्राचार्य आप्पासाहेब टाळके, आबासाहेब पोकळे, श्रीकांत धोंडे, नंदकिशोर धोंडे, आकाश डोंगरे आदी उपस्थित होते.

पान १ वरून...

**लोकनेते स्वर्गीय ...**

आपल्यावर येऊ नये आणि लोकनेत्या ही दिलेली उपाधी कायम टिकवण्यासाठी... कार्यकर्त्यांच्या मनात आपले प्रेम कायम टिकवण्यासाठी त्यांच्या सुखदुःखात नेत्याने कायम राहिले पाहिजे. यावर सुद्धा ताईंना आत्मचिंतन करावे लागेल असे चित्र दिसून येत आहे.

पश्चिम महाराष्ट्रावर कायम वर्चस्व ठेवून संपूर्ण महाराष्ट्रात आपला राजकीय दरारा निर्माण करण्यात जाणते राजे शरदचंद्र पवार यशस्वी राज्यकर्ते ठरले.राजकीय दृष्टिकोनातून पुढारलेला आणि दिग्गज नेत्यांना सुद्धा ठाव ठिकाणा लागू देणार नाही अशी ओळख असलेल्या बीड जिल्ह्यावर सुद्धा शरदचंद्र पवार साहेबांनी आपल्या विचारांवर हा जिल्हा कवेत घेत राष्ट्रवादीचा बालेकिल्ला केला होता आणि आजही तो आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. बीड जिल्ह्यातील अनेक नेत्यांना विविध राजकीय लाभांची पदे ज्या नेतृत्वाने देऊन त्यांना मोठ केल, खासदार केलं,आमदार केलं, नगराध्यक्ष केलं,सभापती केलं,जिल्हा परिषदेचे अध्यक्ष केलं, अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांवर सत्तेत संधी दिली. सहकार,शैक्षणिक क्षेत्रामध्ये पाठबळ दिलं.ज्यांना नाव, पैसा सर्वकाही दिलं त्याच बीड जिल्ह्यातील लोकनेत्यांना आणि लाभार्थी पदाधिकारी,कार्यकर्त्यांना आपल्या साहेबांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करावा त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचे बॅनर लावावे याचा विसर पडावा याचे आश्चर्य वाटते.

**गोपीनाथगडाची निर्मिती ....**

प्रारंभी सकाळी ना.पंकजाताई मुंडे, मातोश्री प्रज्ञाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे, आ.धनंजय मुंडे व मुंडे परिवाराने लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी पुढे बोलताना ना.पंकजाताई म्हणाल्या, मुंडे साहेबांच्या जीवनाचा प्रवास वंचित, पिडीतांसाठी होता. प्रत्येकवेळी स्वत:पेक्षाही जास्त विचार त्यांनी लोकांचा केलेला आहे. स्वत:च्या जिवापलीकडे जावुन इतरांचा विचार करणारा हा अव्दितीय लोकनेता व माझा पिता आहे. मुंडे साहेबांचा एकदा अपघात झाला होता तो फार भयंकर होता त्यावेळी एक लहान मुलगा रस्ता पार करत असताना त्याला वाचविण्यासाठी चालकाने गाडी अचानक वळवली, तो मुलगा बचावला पण मुंडे साहेबांनाच खुप मोठी हानी झाली, रुग्णालयात दाखल केले गेले. मुंडे साहेब शुध्दीवर आल्यानंतर पहिला प्रश्न त्यांनी विचारला तो मुलगा कसा आहे? त्याला काही लागलयं का? त्याचा पुर्ण इलाज करा, त्याला तर खरचटलं पण नव्हतं. परंतु अशा स्वत:च्या जिवावर बेतलेल्या वेळीही मुंडे साहेबांना काळजी लोकांची होती. स्वत:च्याही पलिकडे जावुन त्यांनी लोकांचा विचार नेहमीच केला. मी मुंडे साहेबांच्या समाधीच्या चरणी हीच प्रार्थना केली की त्यांनी जे-जे उभा केले ते मोठे करण्याची आमची क्षमता असो अथवा नसो पण त्याला सदृढ ठेवणं आणि ती परंपरा कायम ठेवणं हेच आशीर्वाद आम्हाला द्या.

# बांधकाम कामगारांनो सावधान
## बोगस एजंट दलाल आणि फसवणूक करणाऱ्यांपासून दूर रहा सरकारी कामगार अधिकाऱ्यांचे आवाहन

जालना प्रतिनिधी :- जालना जिल्ह्यातील बांधकाम कामगारांची विविध माध्यमांतून होत असलेली फसवणूक रोखण्यासाठी सरकारने कडक इशारा दिला आहे.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सर्व योजना पूर्णपणे नि:शुल्क आहेत.कोणत्याही व्यक्तीला पैशाचे व्यवहार करू नका असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.पैसे मागणाऱ्यांविरुद्ध तात्काळ तक्रार करा

कामगारांची सरळसोट फसवणूक करण्यासाठी काही बोगस संघटना स्वयंघोषित एजंट आणि दलाल मंडळाच्या नावाने पैसे उकळत असल्याचे प्रकार उघड होत आहेत.

त्यावर कठोर भूमिका घेत जाधव यांनी स्पष्ट केले कोणीही नोंदणी, नूतनीकरण योजना अर्ज सुरक्षा संच किंवा गृहपयोगी संच घेऊन देतो असे सांगून पैशांची मागणी करत असेल तर तातडीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अथवा जालना येथील सरकारी कामगार अधिकारी कार्यालयात तक्रार नोंदवा.मंडळाच्या सर्व योजना पूर्णपणे नि:शुल्क

२०१२ पासून कार्यरत असलेल्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने १ जुलै २०२० पासून सर्व कामकाज संगणकीकृत केले आहे.त्यामुळे बांधकाम कामगारांची नोंदणी नूतनीकरण

विविध योजनांचे ऑनलाइन अर्ज

हे सर्व कोणत्याही एजंटच्या मदतीशिवाय थेट ऑनलाइन पद्धतीने होतात.

एजंट,दलाल,बोगस संघटनांची नेमणूक केलेली नाही



सरकारी कामगार अधिकाऱ्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले

या कार्यालयाकडून कोणत्याही एजंट संघटना किंवा दलालाची नेमणूक केलेली नाही.अशा कोणालाही पैसे दिल्यास तुमची फसवणूक होऊ शकते.

बांधकाम क्षेत्रातील कामगारांकडून पैसे उकळणाऱ्या टोळ्यांवर प्रशासनाने तातडीने कारवाई करण्याची तयारी दर्शवली असून अशा फसवणूक करणाऱ्या व्यक्तींवर कठोर पावले उचलण्यात येणार आहेत.

कामगारांनी सावधानता बाळगावी प्रशासनाचा कडक इशारा बांधकाम कामगारांनी कोणत्याही लालूचाला बळी न पडता थेट सरकारी प्रणालीचा वापर करावा.

फसवणुकीचे प्रकार समोर आढळल्यास तातडीने पोलिस किंवा संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा असेही आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा दोन गुंडांना दणका !

## बीड जिल्हयातील अवैध मटका जुगार चालक व एक धोकादायक गुंडाची एमपीडीए कायद्याअंतर्गत हसुल कारागृहात रवानगी

बीड ।प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे तसेच वाळु माफीयांचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चझऊ- व चउजउ- कायद्या पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दोघांना छत्रपती संभाजी नगरच्या हर्सूल कारागृहात रवानगी करण्याचे आदेश दिले आहेत. या दणकेबाज कारवाईमुळे गुंडगिरी आणि अवैध गिरी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.**

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे तसेच वाळु माफीयांचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चझऊ- व चउजउ- कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. मा. पोलीस अधीक्षकांच्या सुचनेवरुन प्रभारी अधिकारी पो.नि. पो.स्टे. अंबाजोगाई शहर यांनी इसम नामे १) गोविंद धर्मराज काळे वय ४० वर्षे रा. मंडी बाजार, पाटील चौक, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड व सपोनि तलवडा यांनी इसम नामे २) गोवर्धन सिध्देश्वर येलजाळे वय २० वर्षे रा. रोहीतळ ता. गेवराई जि. बीड यांचे विरुध्द चखऊ- कायद्या अंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा जिल्हादंडाधिकारी बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसम क्रमांक याचे विरुध्द पो.स्टे. अंबाजोगाई शहर येथे कल्याण व मिलन मटका खेळणे व खेळवीणे.१ रुपयाचे ९० रुपये देण्याचे अमिष दाखवुन बेकायदेशीर रित्या मटका जुगार चालविणे व धमक्या देणे शिवीगाळ करणे अशा गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे याकरीता त्याचेवर कलम १२९ बीएनएसएस अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती. तरीसुध्दा त्याचे वर्तणात सुधारना झाली नाही. तसेच स्थानबध्द इसम क्रमांक २ याचे विरुध्द पो.स्टे. तलवडा, येथे महिलांना पळवुन नेवुन बलात्कार करणे, गैरकायदयाची मंडळी जमविणे, दंगा करणे, गंभीर दुखापत करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, शिवीगाळ करणे, अवैध दारू विक्री करणे या व अशा गंभीर स्वरूपाचे एकुण ०४ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यातील ०२ गुन्हे न्याप्रविष्ठ व ०२ गुन्हे तपासावर आहेत. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे या करीता त्याचेवर कलम १२९ बीएनएसएस अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती तरी त्याचे वर्तणात सुधारना झाली नाही.

सदर प्रकरणात श्री. विवेक जॉन्सन जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक १०.१२.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने चझऊ- कायद्या अंतर्गत आदेश पारीत करून सदर दोन्ही इसमास तात्काळ तांब्यात घेवून हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित पो. स्टे प्रभारी अधिकारी व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा श्री शिवाजी बटेवाड व स.पो.नि. निलंगेकर पो. स्टे. तलवाडा यांनी संयुक्तरित्या पोलीस अंमलदार यांचे मार्फत गोपणीय माहीतीच्या आधारे सदर इसमांना दि. १०.१२.२०२५ रोजी ताब्यात घेऊन नमूद इसमांना हर्सूल कारगृह, छत्रपती संभाजीनगर येथे दि. १०.१२.२०२५ रोजी हजर करुन स्थानबध्य केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री नवनीत कौवत (भापोसे), अपोअ अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके, सचिन पांडकर, अपोअ बीड, उविपोअ गेवराई श्री. अनिल कटके, उविपोअ अंबाजोगाई श्री शिंदे, पोनि स्थागुशा श्री. शिवाजी बंटेवाड, यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. शरद जोगदंड, पोह बडकर, पोह इंगळे पोअ काळे सर्व पो.स्टे. अंबाजोगाई शहर तसेच सपोनि मनोज निलंगेकर, पोउपनि कोळी, अन्नलवास पोह अंजन गडदे पोह मोसीन शेख सर्व पो.स्टे. तलवडा तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, पोह गोविंद राख, रामचंद्र केकान, सचिन आंधळे, गोविंद भताने, निलेश ठाकुर सर्व नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे.

भविष्यातही बीड जिल्ह्यात घडणा-या गुन्ह्यातील व वाळूचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक बस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या, खंडणी बहादर धोकादायक गुंडावर, बेकायदेशीर जुगार व लॉटरी बालवणा-या गुन्हेगाराचा अभिलेख तपासणी कामी मा. पोलीस अधीक्षक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक नेमण्यात आलेले असुन त्यांच्याकडुन गुन्हेगाराच्या अभिलेखाची पडताळणी करून यापुढेही जास्तीत जास्त चझऊ- व चउजउ- कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कौवत (भापोसे) यांनी दिले आहेत.

---

## पीएसआयपदी नियुक्तीबद्दल मुंजाभाउ कुहारे यांचा सत्कार

### भारतीय मच्छुवारा व भोई समाज संघटनेचा पुढाकार

माजलगाव ।प्रतिनिधी

तालुक्यातील सावरगाव येथील भुमिपुत्र मुंजाभाउ भिमराव कुहारे यांची पीएसआयपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा भारतीय मच्छुवारा व भोई समाज संघटनेच्या वतीने दि. ११ डिसेंबरला सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय मच्छुवारा व भोई समाज संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश मंत्री व कहार मच्छिमार समाज संघटनेचे राष्ट्रीय महासचिव अंकुश रामभाउ बलया, हरिश्चंद्र सखाराम लुचारे, पोलिस पाटील बंडु अर्जुन जगताप, मनोज जगताप, बाळु जगताप, प्रल्हाद बाळा नाईकनवरे, पत्रकार संघाचे सचिव दिनकर शिंदे, दत्ता जगताप, योगेश जगताप, तुकाराम लुचारे, गुलाब फंदी, गुलाब कुहारे, रमेश कचरे, गोरख पट्टे, अमर जगताप, विश्वजीत जगताप, दिलीप जगताप, रामा चावरे यांची उपस्थिती होती. दरम्यान तालुक्यातील सावरगाव येथील भुमिपुत्र मुंजाभाउ भिमराव कुहारे यांची पीएसआयपदी नियुक्ती झाल्याबद्दल सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

---

## परिवंत गायकवाड यांना जिजाऊ माँसाहेब आदर्श उद्योग पुरस्कार जाहीर

आष्टी ।प्रतिनिधी

मराठा सेवा संघ प्रणीत तानुबाई बिरजे पत्रकार परिषद आष्टी यांच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना जिजाऊमाँसाहेब आदर्श पुरस्कार प्रदान केला जातो. यावर्षीचा हा मानाचा पुरस्कार आष्टी तालुक्यातील क-हेवडगाव येथील सरपंच तथा उद्योगपती परिवंत गायकवाड यांना जिजाऊ माँसाहेब आदर्श उद्योग पुरस्कार जाहीर झाला असल्याची माहिती ज्येष्ठ पत्रकार सीताराम पोकळे यांनी दिली. सामाजिक, उद्योग राजकीय क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण २५ वर्षाच्या आणि प्रभावी कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

परिवंत गायकवाड यांच्या निवडीबद्दल आ. सुरेश धस, माजी सभापती अरुणभैय्या निकाळजे, कड्याचे माजी सरपंच रामशेठ मधुरकर, माजी नगरसेवक सादिक कुरेशी, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, सेवानिवृत पोलीस निरीक्षक मिलींद निकाळजे, अस्लम शेख, प्रविण डोंगरे, माजी नगरसेवक दिपक निकाळजे, नाट्यकलावंत दिग्दर्शक रुपेश निकाळजे, राजेंद्र बोरुडे, सोमीनाथ विधाते, दिलीप राऊत, राजेंद्र लाड यांच्यासह सर्व क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन केले आहे. गायकवाड यांची आदर्श उद्योगपती पुरस्कारासाठी निवड झाली आहे. विधायक कार्य आपल्या हातुन होत आहे असेच आपल्या हातून निरंतर घडत राहो. आपल्या उल्लेखनीय कार्यातून एक सक्षम राष्ट्राच्या प्रस्थापनेचा प्रवाह भक्कम होऊन सखोल मानवीय अंतर्मनाचा चेहरा प्रफुल्लित सन्मुख होतो. तुम्ही कार्यरत असलेल्या क्षेत्रात तुमच्या कार्याचा ठसा उमटवला आहे. आपल्या हातून होत असलेली राष्ट्रसेवा ही खरोखरंच अभिमानाची व कौतुकास्पद बाब आहे.

मेहनत, सातत्याने सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याची भूमिका घेऊन चालतांना कार्यरत असलेल्या क्षेत्रामध्ये नव्याने येऊ पाहणाऱ्या युवकांना नक्कीच प्रेरणा मिळते. सरपंच परिवंत गायकवाड यांना पुरस्कार जाहिर झाल्याबद्द त्यांचे मित्रपरिवार व मान्यवराकडून अभिनंदन होत आहे. आष्टी तालुक्यातील क-हेवडगावचे परिवंत सरपंच, उद्योगपती गायकवाड यांना अलिकडेच महाराष्ट्र भुषण आदर्श सरपंच राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे. क-हेवडगाव या छोट्या गावाला हा मोठा सन्मान मिळाला आहे. क-हेवडगावचे कार्यतत्पर, समाजसेवेचा वसा घेतलेले सरपंच परिवंत उत्तम गायकवाड यांना यापूर्वी अनेक राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आलेले आहेत. या गौरवामुळे केवळ क-हेवडगावच नव्हे तर संपूर्ण आष्टी तालुक्याची मान उंचावली आहे. कोरोना काळात जेव्हा सर्वत्र भय आणि अनिश्चिततेचे वातावरण होते तेव्हा सरपंच परिवंत गायकवाड यांनी सेवा हीच श्रद्धा या भावनेतून ग्रामस्थांना किराणा किट, मास्क व सॅनिटायझरचे वाटप करून मानवता जापली आहे.



कर्हेवडगाव येथे विविध जयंती, उत्सव, सामाजिक उपक्रम, हरिनाम सप्ताह आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी पुढाकार घेत महापंगत, अन्नदान केलेले आहे. विद्यार्थींना शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे. अनेक उपक्रमांद्वारे समाजसेवा केली आहे व करीत आहेत. सरपंच गायकवाड यांच्या कार्यातून समाजाच्या प्रत्येक घटकाला स्पर्श करणारा संवेदनशील दृष्टीकोन दिसून येतो नेत्रदान शिबिरांचे आयोजन करून लोकांना जनजागृती केली. चष्मे वाटप केले. नेत्रदानासाठी निवड झालेल्या रुग्णांना स्वखर्चाने पुणे, अहिल्यानगर, मुंबई येथे शस्त्रक्रियासाठी दाखल होण्यासाठी बसभाड्याची व निवासाची सोय केली आहे. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, अन्नदान, किराणा किट वाटप आणि गोरगरीबांसाठी आर्थिक मदत हे त्यांच्या सततच्या कार्याचे वैशिष्ट्य ठरले आहे. दिवाळी, पाडवा, जयंती प्रत्येक सणासुदीला ते जनतेसोबत असतात. सेवाभाव हा गायकवाडांचा संकल्प आहे ग्रामस्थ प्रेमाने म्हणतात.

गेल्या २५ वर्षांपासून आ. सुरेश धस यांचे कट्टर समर्थक म्हणून परिवंत गायकवाड हे राजकीय कार्य करीत आहेत. सरपंच गायकवाड हे जनहिताला सदैव प्राधान्य देतात. त्यांच्या या निःस्वार्थ, विकासाभिमुख आणि मानवता, सेवाभावाचा गौरव म्हणून हा मानाचा पुरस्कार गायकवाड यांना मिळाला आहे.

---

## युवा उद्योजक चेतन बोरा यांचा वाढदिवस नवजीवन संगोपन केंद्र येथील गोरगरीब मुलांना एक महिन्याच्या किराणा सामानाची मदत करून साजरा

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यात नवजीवन फाउंडेशन संचलित नवजीवन संगोपन केंद्र येथे अनाथ, निराधार, ऊसतोड मजूर, वीटभट्टी कामगार, आदिवासी, भटके विमुक्त, गरीब, वंचित, दुर्लक्षित घटकातील गोर गरीब मुलांचा मोफत सांभाळ करून त्यांना मोफत शिक्षण दिले जाते.

या नवजीवन संगोपन केंद्रास शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा मदत मिळत नाही. सदरील केंद्र





समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून आणि मदतीतून चालवले जात आहे. या अनाथ, निराधार मुलांना फुल ना फुलाची पाकळी मदत व्हावी. तसेच आपणही समाजाचे काही देणे लागतो या उदात्त भावनेने दरवर्षी प्रमाणे या वर्षीही कडा येथील युवा उद्योजक चेतन बोरा यांनी आपला वाढदिवस अनावश्यक खर्च टाळून नवजीवन संगोपन केंद्र येथील गोरगरीब, अनाथ निराधार गरजू मुलांना एक महिना पुरेल एवढे किराणा सामानाची मदत करून उदात्त भावनेने तसेच सामाजिक उपक्रमाने साजरा केला. त्यांच्या या मोठ्या मनाने केलेल्या अनमोल मदतीबद्दल आणि त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना या अनाथ निराधार मुलांच्या वतीने कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा. त्यांच्या हातून अशीच प्रामाणिक सेवा घडो आणि त्यांना उदंड आयुष्य लाभो हि आई जगदंबा चरणी प्रार्थना. चेतन बोरा हे सर्व सामान्य कुटुंबातील ईमानदार आणि कष्टाळू व्यक्तिमत्त्व असून नेहमीच सामाजिक कार्यात आघाडीवर राहून सहकार्य करतात. कार्यक्रमाच्या शेवटी नवजीवन संगोपन केंद्र संस्थापक अध्यक्ष विकास म्हस्के मेजर यांनी सर्वांचे मनापासून आभार मानले.

---



**आज सावरगाव ता.गेवराई येथे माजी केंद्रीय मंत्री आणि राज्याचे माजी उप-मुख्यमंत्री लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे साहेब यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी युवा नेते संदीप आंधळे, उपसरपंच अभिमान मिसाळ, वैजनाथ चव्हाण,आण्णाभाऊ जाधवर, दिनकर जाधवर, कृष्णा मिसाळ, रामभाऊ मिसाळ, वणवे, गव्हाणे, बाबासाहेब खाडे, गणेश इंगोले, कल्याण सतकर सर, शहादेव जिजा आंधळे, रामकिसन वणवे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

---

# ७० हजार कुटुंबांना मिळणार हक्काचे घर

नागपूर /प्रतिनिधी

हैदराबाद इनामे व रोखे अनुदाने रद्द सुधारणा विधेयक गुरुवारी विधानसभेत एकमताने मंजूर झाले. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील आणि चंद्रपूरच्या राजुरा भागात इनामी जमिनींवर राहणाऱ्या सुमारे ७० हजार कुटुंबांच्या जमिनी मोफत नियमित होतील. यातून मराठवाड्यातील हजारो कुटुंबांच्या डोक्यावरील टांगती तलवार 'मदतमाश' इनामी जमिनींचा प्रश्न अखेर निकाली निघाला. यात देवस्थानांच्या जमिनीचा संबंध नाही, असे महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले.

उपजीविकेसाठी शासन किंवा राजाने दिलेली जमीन म्हणजे मदतमाश

'मदतमाश' हा शब्द मूळतः मराठवाड्यातील निजामकालीन इनाम जमिनींशी संबंधित आहे. 'मदतमाश' जमीन शासन किंवा राजाकडून व्यक्तीच्या उपजीविका किंवा मदतीसाठी दिली जात असे. यात 'खिदमतमाश' म्हणजे सेवेच्या बदल्यात आणि देवस्थान इनाम म्हणजे धार्मिक कार्यासाठी दिलेली जमीन असे प्रकार होते.

शासनाचे उत्पन्न बुडेल; महायुतीला मनपा, जि.प.त लाभ





मोक्याच्या ठिकाणी असलेली ही जमीन आता मोफत नियमित होणार असल्याने सामान्य लोकांना आर्थिक लाभ होईल, तर महायुतीला महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीत त्याचा लाभ होईल. दुसरीकडे शासनाचे उत्पन्न मात्र बुडणार आहे. 'मदत माश' जमिनीच्या मोफत नियमितीकरणाचा मार्ग मोकळा'वर्ग-२' च्या जमिनी आता होणार 'वर्ग-१' महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत घोषणा हैदराबाद इनामे व रोखे अनुदाने रद्द सुधारणा विधेयक एकमताने मंजूर

### कोकण आणि मुंबईसाठीही आश्वासक निर्णय

- चर्चेत भाग घेताना भास्कर जाधव (शिवसेना-उबाठा) यांनी कोकणातील मच्छिमारांच्या जमिनींचा प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले, मच्छिमार अनेक पिढ्यांपासून तिथे राहतात, पण जमीन त्यांच्या नावावर नाही. त्यांनाही हैदराबाद इनामाप्रमाणे न्याय द्यावा. तर आमदार मनीषा चौधरी यांनी मुंबईतील कोळीवाडे आणि गावठाणांच्या सीमांकनाचा मुद्दा मांडला. यावर उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी कोकणातील बांधकामांना गावठाणाचा दर्जा देण्यासाठी आणि मुंबईतील प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

### देवस्थानच्या जमिनी लाटण्याचा प्रकार नाही ना?'

- चर्चेदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) गटनेते जयंत पाटील यांनी शंका उपस्थित केली. ते म्हणाले, हे विधेयक केवळ काही मूठभर लोकांसाठी किंवा विकासकांसाठी आहे का? देवस्थानांच्या जमिनी लाटून त्या विकल्या गेल्या आहेत, त्यांना अभय देण्यासाठी हा घाट घातला जात आहे का? हे विधेयक देवस्थान जमिनींना लागू होणार नाही, हे स्पष्ट करावे.त्यावर उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी देवस्थानशी याचा काहीच संबंध नसल्याचे स्पष्ट केले. हे विधेयक केवळ 'मदत माश' इनामापुरते मर्यादित आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगरमधील ९७ गट, जालन्यातील १०, परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर, धाराशीव आणि चंद्रपूरमधील राजुरा येथील १० गटांचा समावेश आहे.

### कशा आहे नवीन सुधारणा?

- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधेयक मांडताना स्पष्ट केले की, १९५४ च्या कायद्यानुसार या जमिनी भोगवटादार वर्ग-२ (नवीन व अविभाज्य शर्ती) म्हणून गणल्या जात होत्या. त्यामुळे या जमिनींवर कर्ज मिळत नव्हते किंवा त्या हस्तांतरित करता येत नव्हत्या. यापूर्वी अशा जमिनी नियमित करण्यासाठी चालू बाजारभावाच्या ५० टक्के किंवा ५ टक्के रक्कम भरावी लागत होती, ज्यामुळे नागरिक पुढे येत नव्हते. मात्र, आता मंजूर झालेल्या विधेयकानुसार, जर एखाद्याने जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय निवासी कारणासाठी जमिनीचा वापर केला असेल आणि त्याबाबतचे खरेदीखत किंवा नोंदणीकृत दस्तऐवज सादर केल्यास, कोणताही नजराणा न आकारता ती जमीन नियमित केली जाईल. तसेच, संबंधित जमीनधारकास 'भोगवटादार वर्ग-१' चा दर्जा मिळेल, ज्यामुळे त्यांना पूर्ण मालकी हक्क प्राप्त होतील.

# संजय गांधी निराधार योजनेच्या अध्यक्षपदी सौ.पुनमताई पवार यांची शासनाकडून नियुक्ती!

धर्माबाद (अशोक पडोळे)

गेल्या वर्षभरापासून प्रलंबित असलेल्या व अतिशय जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आधारित असलेल्या संजय गांधी निराधार समिती योजनेच्या अध्यक्षपदी आमदार राजेश पवार यांच्या सुविद्य पत्नी माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.पुनमताई पवार यांची शासनाने नियुक्ती केली आहे.

शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग समिती, शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, तद्वतच माननीय मंत्री, इतर मागास, बहुजन कल्याण, दुग्धविकास अपारंपारिक ऊर्जा मंत्रालय मुंबई यांच्या पत्राअन्वये तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या शिफारसी प्रमाणे संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या धर्माबाद तालुका अध्यक्ष व सदस्य पदांची कार्यकारणी नुकतीच शासनातर्फे जाहीर करण्यात आली.



या समिती मध्ये अध्यक्ष म्हणून सौ.पुनमताई पवार तर सदस्य म्हणून दुसऱ्यांदा संजय तुळशीराम कदम यांची नियुक्ती करण्यात आली. तद्वतच व्यंकटेश चिन्नना अबुलकोड, सूर्यकांत नागनाथ मुळे, दत्तात्रय दिगंबर आलूरोड यांचीही अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.

उपरोक्त नियुक्त केलेले अध्यक्ष व सदस्य यांनी संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची बैठक शासन निर्णय दिनांक २० ऑगस्ट २०१९ नुसार नियमित घेऊन शासनाच्या आदेशानुसार लाभार्थ्यांची अर्ज मंजुरी बाबतची कार्यवाही करण्यात यावी असे सांगितले असून या आदेशानुसार उक्त समिती अस्तित्वात आली असे समजण्यात येईल असेही संबोधित करण्यात आले आहे.

उपरोक्त समिती अस्तित्वात येऊन योग्य लोकांना समितीमध्ये स्थान मिळाल्यामुळे धर्माबाद तालुक्यात सर्वत्र कौतुक होत असून निराधाराचे प्रश्न तात्काळ सोडून त्यांना उपरोक्त योजनेद्वारे आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी सर्व सदस्यांनी प्रयत्न करावेत असे आवाहन नवनिर्वाचित अध्यक्षा पुनमताई पवार यांनी केले असून स्वतः या योजने संदर्भात जातीने लक्ष घालून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना आर्थिक लाभ मिळवून देण्याचा निश्चय त्यांनी केला आहे.

# आयुरमंगलम् निवासी मूकबधिर विद्यालयात ८१ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

## महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचालचा ४३ वा अनोखा उपक्रम

बीड ।प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनी मिळालेल्या वही पेन दानातून महामानव अभिवादन ग्रुपने आयुर्मगलम् निवासी मूकबधिर विद्यालय बीड येथे ८१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य ( वही पेन) वाटप केले. तर मुलांमध्ये वाचनाची गोडी लागावी म्हणून वाचन संस्कृती वाढवण्याकरिता प्रयत्न करत असलेल्या वाचाल तर वाचाल ह्या फिरते मोफत वाचनालयाच्या ४३ व्या केंद्राचा १०० पुस्तकांचा संच देऊन प्रारंभ करण्यात आला. वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाला सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार गिनीज वर्ल्ड रेकॉर्डस प्राप्त सुहास पालीमकर यांनी सुहास्य नगरीचे रेषा संदेश या पुस्तकांच्या ६ प्रती भेट दिल्या त्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी निवासी मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक अलोक कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे म्हणून वाचाल तर वाचाल वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी.



वानखेडे, व समता सैनिक दलाचे मेजर तथा कॅप्टन राजाभाऊ आठवले लाभले होते. महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, डी.एम. राऊत, व के.एस.वाघमारे यांची विचार मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के.एस.भुजबळ यांनी केले. तर प्रास्ताविक जी.एम.भोले यांनी केले.सर्वप्रथम स्वामी विवेकानंद, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून दिप प्रज्वलीत करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी भारतीय घटनेच्या प्रस्ताविकाचे वाचन घेतले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जी.एम.भोले यांनी महामानव अभिवादन ग्रुप करत असलेल्या कार्याबद्दल सविस्तर माहिती दिली.

निवासी शाळेतील वर्ग दहावीचा विद्यार्थी गणेश कांबळे यांनी महापुरुषांच्या कार्याबद्दल हाताच्या व चेहऱ्याच्या हव भावा द्वारे माहिती दिली. महापुरुषांचे कार्य व उपदेशा पासून प्रेरणा घेऊन शिक्षणात कितीही अडचणी आल्या तरी उच्च शिक्षण घेऊन प्रगतीचे शिखर गाठू असा दृढ विश्वास त्याने व्यक्त केला. या विद्यार्थ्याचे मनोगत वाचा उपचार तज्ञ नामसेकर जे.एस.यांनी उपस्थितीना अवगत करून दिले. त्या मनोगतातील दृढनिश्चया बद्दल सर्वांनी टाळ्यांच्या गजरात गणेश कांबळे यांचे कौतुक करून वाचाल तर वाचाल वाचनालया तर्फे शालेय साहित्य व यु कॅन डू हे प्रेरणादायी पुस्तक मान्यवरांच्या हस्ते भेट देऊन सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप आलोक कुलकर्णी यांनी केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी.एम.राऊत यांनी केले.कार्यक्रमास निवासी विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिजाऊ माँसाहेब आदर्श पुरस्कार प्राप्त सुखदेव पोकळे यांचा जिल्हा दिव्यांग कार्यालयात सत्कार संपन्न

आष्टी ।प्रतिनिधी

दिव्यांग क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम केल्याबद्दल मराठा सेवा संघ प्रणित तनुबाई बिरजे पत्रकार परिषद यांच्या वतीने छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील रहिवासी सुखदेवराव पोकळे यांना यावर्षीचा राज्यस्तरीय जिजाऊ माँ साहेब आदर्श संस्थाचालक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा बीड जिल्हा दिव्यांग कल्याण विभाग कार्यालय बीड यांच्यावतीने अंकुश नखाते साहेब यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



छत्रपती शाहू महाराज अपंग पुनर्वसन संस्था, शाहू महाराज बहुउद्देशीय संस्था व शिक्षण संस्था यांच्या माध्यमातून संस्थापक अध्यक्ष सुखदेवराव पोकळे यांनी आष्टी तालुक्यामध्ये दिव्यांग, अनाथ, निराधार, विधवा अशा दुर्लक्षित घटकासाठी गेली २५ वर्ष आपले काम सुरू ठेवले आहे. त्यांनी या गोरगरीब जनतेसाठी केलेल्या कार्याची दखल म्हणून मराठा सेवा संघ आष्टी व तनुबाई बिरजे पत्रकार परिषद आष्टी यांच्यावतीने आदर्श संस्थाचालक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत व मिळालेल्या पुरस्काराबद्दल बीड जिल्हा दिव्यांग कल्याण कार्यालय यांच्या वतीने अंकुश नखाते साहेब यांनी बीड येथे जिल्हा समाज कल्याण कार्यालय येथे सुखदेव पोकळे यांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला व पुढील कार्याला शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी अंकुश नाखाते, विजय पांडव, उमेश धुमाळ, बंटी करंजकर, जीवन देशमुख, सय्यद सर, अजय साबळे, विजय झांजे हे उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत संस्थाचालक सुखदेव पोकळे यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# ज्ञानाबरोबरच विज्ञान ही अध्यात्माची देण आहे – डॉ. रमेश गटकळ

माजलगाव ।प्रतिनिधी

ज्ञानाबरोबरच विज्ञान ही अध्यात्माची देण आहे असे प्रतिपादन डॉ. रमेश गटकळ यांनी केले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर व श्री सिद्धेश्वर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. सी. व्ही. रमण व्याख्यानमालेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी प्रकाश दुगड हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते तर प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना, प्रा. अंकुश साबळे हे उपस्थित होते. डॉ. रमेश गटकळ यांनी अध्यात्माचे महत्त्व सांगितले. अध्यात्मातूनच विज्ञानाची उत्पत्ती झाली. रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी व इतर प्राचीन धर्मग्रंथांमध्ये




विज्ञानाची माहिती आलेली आहे. महाभारतातील संजयने युद्धाचे वर्णन धृतराष्ट्राला लाईव्ह पद्धतीने सांगितले होते तो एक वैज्ञानिक भाग होता असे त्यांनी सांगितले.उद्घाटनपर भाषणात प्रकाश दुगड यांनी अध्यात्म बरोबरच विज्ञानाचा सुद्धा अभ्यास केला पाहिजे कारण विज्ञानामुळे प्रगती झाली तर अध्यात्मामुळे मानवी जीवनामध्ये शांतता निर्माण होते असे सांगितले. विज्ञानाच्या प्रगतीमुळे जे अपंग व्यक्ती आहेत त्यांना वेगवेगळे साधन प्राप्त होऊ शकले व त्यांचे जीवन सुकर झाले असे ते म्हणाले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सिताराम इंगोले यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी विकास मंडळाचे प्रमुख डॉ. प्रेम राठोड व विज्ञान मंचचे प्रमुख डॉ. विकास बोरगावकर

# श्रीमद् भागवत कथा व यज्ञ सोहळ्याचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा – सौ. अर्चना सिध्देश्वर

आष्टी ।प्रतिनिधी

समाधान आनंद प्राप्त करण्याकरिता देव दुर्लभ, वेदशास्त्र पुरणाचे सारकथन करणारे, मोक्ष प्राप्तीचे साधन असणारे श्रीमद् भागवतकथा रसायन हेच एकमेव साधन आहे. वीतरागी श्री शुकमुनीने कथीले व परमश्रेष्ठ साध्य प्राप्तेच्छु राजा परिक्षतेने परिसले अशा श्रीमद् भागवत कथेचे निरूपण प. पु. भागवताचार्य वे. शा. संत श्री. नंदकिशोरजी महाराज गोंदीकर (जालना) यांच्या गोडवाणीतून रविवार दिनांक ७/१२/२०२५ ते शनिवार दिनांक १३/१२/२०२५ पर्यंत सौ. व श्री. अर्चना संजय सिध्देश्वर यांच्या वतीने विठ्ठल मंदिर जामखेड येथे आयोजन करण्यात आले असून श्रीमद् भागवत कथा व ज्ञान यज्ञ सोहळ्याचा भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन सौ. अर्चना संजय सिध्देश्वर केले आहे.भागवत कथाकार प. पू. भागवताचार्य वे. शा. संत श्री. नंदकिशोरजी महाराज गोंदीकर (जालना) यांच्या गोडवाणीतून होणाऱ्या कथा श्रवणासाठी त्यांना तबलासाथ ह. भ. प. शंकर महाराज माळी. हार्मोनियम श्री. धर्माधिकारी मेजर, गायक ह. भ. प. पंढरीनाथ महाराज राजगुरू राहणार



असून श्रीमद् भागवत ग्रंथ संहिता वाचन वे. शा. सं. विनायक शास्त्री जोशी यांचे सकाळी ८:०० ते ११ :०० ग्रंथ वाचन होणार आहे तर दुपारी २:००ते ५:०० वाजता कथा निरुपण, आरती व प्रसाद होणार आहे तर शनिवार दिनांक १३/१२/२०२५ रोजी सकाळी दहा ते बारा यावेळेत ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज पवणे यांचे काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून जास्तीत जास्त भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन सौ. अर्चना संजय सिध्देश्वर व सिध्देश्वर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# सोमवारी होणा-या ह.भ.प.सुदर्शन मुनी महाराज उदासीन यांच्या अभिष्टचिंतन

## सोहळ्यास उपस्थित रहावे – ह.भ.प.विजय महाराज राजपुरे

आष्टी ।प्रतिनिधी

शिंदेवाडी येथील श्रीक्षेत्र सुदर्शन आश्रमात प्रेममूर्ती गुरुवर्य सुदर्शन मुनी महाराज उदासीन यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन सोमवार दि. १५ डिसेंबर रोजी करण्यात आले. या सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आश्रम व्यवस्थापन आणि भक्तगणांकडून

करण्यात आले आहे. ग्रामीण भागात वसलेले हे तीर्थस्थान आज अध्यात्मिक प्रगतीचे केंद्र म्हणून नावारूपास येत आहे. बाल वयापासूनच अध्यात्माची ओढ असलेल्या सुदर्शन मुनी महाराजांनी इयत्ता दहावीची परीक्षा दिल्यानंतर २००५ मध्ये रांजणी येथील भजनी मंडळासोबत भंडारा डोंगरावरील सप्ताहात सहभागी होऊन आपल्या अध्यात्मिक





प्रवासाची सुरुवात केली.

पुढे जयराम बाबा भोसले आणि नंतर वृंदावन येथे महंत श्री श्री १०८ भरतमुनी महाराज उदासीन व महंत श्री श्री १००८ विश्वमुनीजी महाराज उदासीन यांच्या पवित्र सान्निध्यात त्यांना अपार प्रेम आणि मार्गदर्शन लाभले. सोहळ्याचा प्रमुख आकर्षण म्हणून सायं ७ ते ९ या वेळेत कीर्तनकार तथा बाबांचे शिष्य ह. भ. प. प्रा. विजय राजपुरे यांचे हरिकीर्तन आयोजित करण्यात आले आहे. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन श्री अजिनाथ शेंबडे व श्री अनिल झरांडे यांच्या वतीने करण्यात आले आहे. गुरुवर्य सुदर्शन मुनी महाराज यांच्या तुळा सेवेसाठी ह. भ. प. अमोल महाराज गावडे, जालिंदर कर्डिले, ह. भ. प. विजय राजपुरे व ह. भ. प. गोकुळ महाराज खलाटे यांची सेवा लागली आहे. या भव्य आध्यात्मिक सोहळ्यास उपस्थित राहावे असे ह. भ. प. ऋषी महाराज तांगडे, ह. भ. प. परमेश्वर महाराज जिवडे, ह. भ. प. संभाजीराजे झिंजुर्के आदी भाविकांनी आवाहन केले आहे.


## जाहिरनामा

**जा.क्र.न.प./अंबड/नामांतर/२०२५/६३१**
**कार्यालय नगर परिषद,अंबड**
**दिनांक :- २४/१०/२०२५**

**अर्जदार श्री सौ.श्रीमती :- मोहर गोविंद घुले**

**प्रकरण :- सर्व्हे नं.- ३८ सहान प्लॉट नं.-४ न.प.मि.नं.-१८-८७-४ चे हस्तांतर बाबत**


सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (१८-८७-४) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला---------- येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याी चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बदलल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नंसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

उतु:सिमा
पूर्व :- प्लॉट नं.- ५
पश्चिम :- प्लॉट नं.- ३
दक्षिण :- ०६ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रोड
उत्तर :- बळीराम जाधव यांची मिळकत

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,अंबड**


# जालना येथे ७९वा होमगार्ड वर्धापन दिन उत्साहात साजरा

## ध्वजारोहण पथसंचलन आणि विविध उपक्रमांनी कार्यक्रमाला उत्साहाची भर



फारुक शेख :-दि.१२ डिसेंबर जालना येथे होमगार्ड दलाच्या शौर्य,शिस्त आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतिक मानला जाणारा ७९ वा होमगार्ड वर्धापन दिन जालना जिल्हा होमगार्ड कार्यालयात उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अपर पोलिस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला.

वर्धापन सप्ताहात विविध उपक्रमांची रेलचेल

८ डिसेंबरपासून सुरू झालेल्या वर्धापन सप्ताहांतर्गत होमगार्ड दलाने समाजाभिमुख उपक्रम राबवले.यात समाविष्ट वृक्षारोपण मोहिम, स्वच्छता अभियान शिस्त व सेवा भावना वाढवणारे अंतर्गत कार्यक्रम या उपक्रमांत होमगार्ड जवानांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून वर्धापन दिनाचे औचित्य अधोरेखित केले. ध्वजारोहण व पथसंचलनाची दिमाखदार परंपरा १२ डिसेंबर रोजी मुख्य कार्यक्रमांतर्गत जिल्हा होमगार्ड कार्यालयात ध्वजारोहण आणि पथसंचलन आयोजित करण्यात आले.मुख्य अतिथी आयुष नोपाणी यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा सोहळा संपन्न झाला.त्यानंतर दलाच्या शिस्तीचे दर्शन घडविणाऱ्या पथसंचलनाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. ध्वजारोहणानंतर परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम पार पडत पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाला विशेष ऊर्जितावस्था या प्रसंगी उपस्थित होते

प्रशासकीय अधिकारी किशोर राठोड,केंद्र नायक राजेंद्र शेळके, तालुका समादेशक शरद मोरे, पलटन नायक पुंडलिक अंभोरे, पलटन नायक के.एम.शेख, ए.बी.पठाण,श्री.शेळुळ, तसेच मोठ्या संख्येने होमगार्ड महिला व पुरुष सैनिक संपूर्ण कार्यक्रमात दलाच्या शिस्तबद्धतेची आणि समाजसेवेच्या व्रताची झलक पाहायला मिळाली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बँक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# मनोविकृत मनोज चौधरी व इतरांवर कायदेशीर प्रतिबंधात्मक कार्यवाही करा

## आ. सुरेश धस यांच्या शेकडो समर्थकांचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

बीड ।प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आणि विकासाभिमुख आमदार सुरेश धस यांच्या समाजमाध्यमावरून होत असलेल्या बदनामीप्रकरणी मनोविकृत प्रवृत्तीचा मनोज चौधरी व इतरांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी.या मागणीसाठी आ. धस यांच्या शेकडो समर्थकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेऊन निवेदन दिले.

आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यातील माजी जिल्हा परिषद सदस्य, नगराध्यक्ष, नगरसेवक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती-संचालक, भाजपा पदाधिकारी, सरपंच संघटना, दूध संघ चेअरमन, प्रतिष्ठित व्यापारी अशा विविध संस्थांचे शेकडो पदाधिकारी या निवेदनात सहभागी होते. या निवेदनावर तब्बल अडीचशे ते तीनशे पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.आमदार सुरेश धस हे मराठवाडा भूषण असून गेली ३५ वर्षे जनतेच्या सेवेत प्रामाणिकपणे कार्यरत आहेत. तथापि, मनोज चौधरी हा व्यक्ती व इतर काही लोक गेल्या अनेक दिवसांपासून समाज माध्यमांवर आ. धस यांच्या प्रतिमेला धक्का



पोहोचेल अशा अपशब्दांनी, बदनामीकारक प्रतिक्रिया, शिवीगाळ आणि उत्तेजक भाष्य करत आहे. यामागे त्याचा उद्देश समर्थकांना भडकवून अघटीत घडवून आणण्याचा असल्याचेही निवेदनात नमूद आहे.

सतत जनतेसाठी काम करणारे अशी आ.सुरेश धस यांची प्रतिमा आहे. मात्र गेल्या काही दिवसापासून मनोज चौधरी व इतर काही लोक यांनी फेसबुक व इतर समाज माध्यमावर आमदार सुरेश धस यांची मानहानी होईल बदनामी होईल अशा पद्धतीने मजकूर प्रसाद करून त्यांची प्रतिमा मलिंग करण्याचा प्रयत्न करत आहेत मनोज चौधरी अत्यंत मन विकृत पद्धतीने हे काम करत असून आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानासमोर जाऊन आणि समर्थकांसमोर जाऊन त्यांना राग येईल असा पद्धतीने अत्यंत खालच्या पातळीवरील अर्वाचे भाषेमध्ये शिवीगाळ व बेताल व्यक्तव्य करत आहेत असे या निवेदनात नमूद आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बीड येथील कार्यक्रमादरम्यान देखील या व्यक्तीने आमदार धस यांच्या विरोधात जाहीररित्या गैरवर्तन केले व वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न केला. अशा गंभीर प्रकाराची दखल आजवर पोलीस प्रशासनाने घेतली नसल्याची खंत निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.धस समर्थकांनी संयम पाळला असला तरी सातत्याने होत असलेल्या या मनोविकृत वर्तनामुळे समाजात तणाव निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करून मनोचौधरीवर तात्काळ दखलपात्र गुन्हा नोंदवून कायदेशीर प्रतिबंधात्मक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा उद्भवणाऱ्या परिस्थितीस पोलीस प्रशासन जबाबदार राहील असेही नमूद केले आहे.

कोणी आक्षेपार्ह विधान करून पोष्ट करत असतील तर कायदेशीर कारवाई - नवनीत कॉवत

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या बीड येथील सभेमध्ये मनोज चौधरी यांनी केलेल्या गैरकृत्याची पोलीस विभागाने दखल घेतली आहे.आपल्या सर्वांच्या भावना आम्ही लक्षात घेतल्या आहेत.


### लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त आज

## भाजपा जिल्हा कार्यालयात रक्तदान शिबीरात मोठ्या संख्येने सहभागी व्हा - शंकर देशमुख

बीड ।प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथजी मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्ताने बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हा कार्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असुन मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे.

माणूस किती मोठा असतो हे त्याच्या पदाने नाही, तर त्याच्या लोकांवरील प्रेमाने ठरते आणि गोपीनाथरावजी मुंडे साहेब हे त्याचे जिवंत उदाहरण होते. सामान्य कार्यकर्त्यांच्या हक्कांसाठी लढणारा नेता, शेतकऱ्यांच्या वेदना जाणणारा शेतकऱ्याचा मुलगा, आणि नेहमी लोकांसाठी झटणारा खरा जननेता.म्हणजे गोपीनाथ मुंडे साहेब अशा लोकनेत्याच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर आज शनिवार दि १३ डिसेंबर रोजी भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित केले आहे. सकाळी १० वा या रक्तदान शिबिराला प्रारंभ होणार असून भाजप जिल्हा कार्यालय नाट्यगृह रोड चाणक्य पुरी बीड येथे शिबीर होणार आहे. लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेबांनी आपले आयुष्य लोकांची वंचिताची सेवा करण्यासाठी घातले असून त्यांच्या जयंतीनिमित्त लोकांना जीवनदान देणारे रक्तदान शिबीर



महत्वाचे आहे. तरी जास्तीत जास्त कार्यकर्ते, पदाधिकारी, नेते यांनी रक्तदान करावे व जनतेला ही रक्तदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे. आज बीड ब्लड बॅके मधे रक्ताचा तुटवडा आहे रक्तदान हीच लोकनेत्याला खरी श्रद्धांजली ठरेल असे आवाहन शंकर देशमुख यांनी केले आहे.

या शिबिरास बीड विधानसभा भाजप नेते डॉ.योगेश क्षिरसागर, राज्य परिषद सदस्य ॲड सर्जेराव तांदळे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, शिवाजी मुंडे, अजय सवई, जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे, शांतीनाथ डोरले, अशोक लोढा, अदित्य सारडा, सौ सारीका क्षिरसागर, इर्शाद भाई आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## तुलसी इंग्लिश स्कूल विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल संपन्न

बीड ।प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथील इयत्ता ३ री ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल सोमवार, दिनांक ८ डिसेंबर रोजी संभाजीनगर येथील श्रुष्टी ॲग्रो टुरिझम येथे आयोजीत करण्यात आली.



या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी टायर ब्रिज, क्लाइंबिंग वॉल, रोप ॲक्टिव्हिटी, स्लाइड्स आणि क्लाइंबिंग नेट यांसारखे अनेक साहसी खेळ खेळले. त्यांनी गटागटाने टायरवरून चालणे, दोरींचा आधार घेऊन अडथळे पार करणे आणि उंच स्लाइडवरून घसरून जाण्याचा आनंद घेतला.सहलचे नियोजन शाळेच्या प्राचार्या सौ.उमा जगतकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले तर सहलीच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व कर्मचारी वर्गाने मनापासून परिश्रम घेतले.

## पवारवाडी शिवारात अनोळखी पुरुष जातीचे प्रेत सापडले

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १२/१२/२०२५ रोजी ०७.०० वाजण्याचे पूर्वी पोस्ट माजलगाव ग्रामीण हद्दीत माजलगाव ते परभणी रोड लगत पवारवाडी शिवारात अनोळखी पुरुष जातीचे प्रेत वय ५० ते ५५ वर्ष उजव्या हाताचे पोटरीवर मराठीमध्ये विजय असे गोंदलेले मिळून आले आहे. अनोळखी आहे ओळख पटून येत नाही. नमूद प्रेत हे ओळखीचे असेल तर खालील नंबर वर संपर्क करावा.



## शेतकरी पुत्रांच्या शेतकरी हक्क मोर्चा जाहीर पाठिंबा - प्रा. सुशीलाताई मोराळे

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले, कोरडवाहू शेतकरी तर अक्षरशः बरबाद झाला सोयाबीन, कापूस, तुरीसह खरीपाची वाट लागली. एकीकडे निसर्गाचा कोप तर थोडे बहुत आलेल्या सोयाबीन, कापूस पिकांची खरेदी केंद्र सुरू न होऊ शकल्यामुळे बाजारात लुट झाली ही लुट थांबवण्यासाठी शेतकरी पुत्र एकत्र येऊन त्यांनी २५ डिसेंबर २०२५ रोजी शेतकरी हक्क मोर्चाचे आयोजन केले आहे. या मोर्चात सक्रिय जाहीर पाठिंबा लोकनेत्या किसान संघर्ष समितीच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी दिला आहे.

सोयाबीनला ७,०००/- रुपये क्विंटल कापसाला १२,०००/- रुपये क्विंटल भाव द्या अशी मागणी शेतकरी पुत्रांनी केली आहे. तसेच कापूस, तुर, सोयाबीन, हरभरा या पिकांसाठी शासकीय खरेदी केंद्र तात्काळ सुरू करावेत. खरेदी प्रक्रिया पारदर्शक व सुरळीत करावी शेतमालाला उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा गृहीत धरून बाजार भाव द्यावा. जंगली जनावरांचा बंदोबस्त तात्काळ करावा या व इतर मागण्यांसाठी या २५ डिसेंबर २०२५ च्या मोर्च्याचे आयोजन केले असून जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांनी हजारोंच्या संख्येने



या मोर्चाला छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकात हजर राहावे असे आवाहन प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे.

## गटविकास अधिकारी यांच्या अनुपस्थितीत ग्रामसभेतील ठराव व मान्यता प्रश्नचिन्हाखाली अर्जदाराची चौकशी करून कार्यवाहीची मागणी

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे जीवाचीवाडी येथील ग्राम सभेच्या दि.१६ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीत गटविकास अधिकाऱ्यांची अनुपस्थिती,ग्रामसभेचा ठराव कसा मंजूर झाला आणि तो मान्यतेसाठी कसा सादर करण्यात आला याबाबत गंभीर शंका उपस्थित झाल्या आहेत.संबंधित प्रक्रिये मध्ये कायदेशीर व प्रशासकीय नियमांचे उल्लंघन झाल्याचाआरोप करत अर्जदार सुभाष सखाराम सारूक यांनी गटविकास अधिकाऱ्यांना लेखी तक्रार करून चौकशीची मागणी केली आहे.अर्जदारांनी सादर केलेल्या तक्रारीनुसार, ग्रामसभेतील ठरावा संदर्भातील कागदपत्रे संपूर्णपणे अपूर्ण व संशयास्पद असल्याचे निदर्शनास आले. ग्रामसभेत मांडण्यात आलेला मुद्दा,त्यावर झालेली चर्चा,मंजुरीची प्रक्रिया,जबाबदार अधिकारी यांची उपस्थिती याबाबत कोणतीही स्पष्ट नोंद नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तक्रारीत असे म्हटले आहे की,ग्रामसभा झाल्याचे सांगितले गेले असले तरी प्रत्यक्षात अर्जीदारांना कोणतीही माहिती देण्यात आली नव्हती.तसेच,ठराव मंजूर करण्याच्या प्रक्रियेत गटविकास अधिकाऱ्यांची अनुपस्थिती असूनही ठराव मान्य केल्याप्रमाणे नोंदी तयार करण्यात आल्या.यामुळे कागद पत्रांची विश्वासार्हता आणि संपूर्ण प्रक्रियेची पारदर्शकता संशयास्पद असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय,ग्रामपंचायत कर्मचारी तसेच पोलिस प्रशासनाच्या नावाने तयार करण्यात आलेली माहिती ही खोटी व अपूर्ण असल्याचा अर्जदारांचा दावा आहे.या संदर्भात संबंधित जबाबदार व्यक्तीं वर कारवाई करण्यात यावी व ग्रामसभेचे कागदपत्रात फेरफार करणाऱ्या घटकांची चौकशी करून वास्तविक माहिती उघडकीस आणावी,अशी मागणी



करण्यात आली आहे.

अर्जदारांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की,ग्रामसभेत कोणताही विषय योग्यप्रकारे मांडला गेला नसतानाही,बनावट पद्धतीने ठराव पारित झाल्याचा भास निर्माण करण्यात आला आहे. प्रशासन व गटविकास विभागाने या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देऊनयोग्य ती तपासणी करावी, अन्यथा पुढील पातळीवर दाद मागण्याचा इशाराही अर्जदारांनी दिला आहे.

ही तक्रार गटविकास अधिकारी,गट शिक्षणाधिकारी कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे प्रतिलिपी सह पाठवण्यात आली असून,ग्रामपंचायतीतील व्यवहारातील संभाव्य गैरव्यवहाराबाबत चर्चा सुरू झाली आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या विदर्भीय पाहुणचाराला आमदार सुरेश आण्णा धस यांची हजेरी



पाटोदा ।प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर येथील रामगिरी या शासकीय निवासस्थानी बुधवार रोजी चहापान व अल्पोपहाराचा खास कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात येणाऱ्या या विशेष स्नेहमेळाव्यास अनेक मान्यवरांनी हजेरी लावली.

या कार्यक्रमाला आष्टी-पाटोदा-शिरूर

मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनीही उपस्थित राहून मुख्यमंत्र्यांच्या खास विदर्भीय पाहुणचाराचा मनःपूर्वक आनंद घेतला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे तसेच विधानसभेतील सहकारी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. रामगिरी निवासस्थानी झालेल्या या सुखद स्नेहभेटीत आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत दिलखुलास संवाद साधला. राज्यकारभार, विकास प्राधान्यक्रम आणि विदर्भीय परंपरेचा समृद्ध अनुभव अशा विविध मुद्यांवर मैत्रीपूर्ण वातावरणात चर्चा झाली. या भेटीद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार सुरेश धस यांच्यातील घट्ट असलेला स्नेहबंध, परस्पर विश्वास आणि राजकीय समन्वय पुन्हा एकदा प्रकर्षाने अधोरेखित झाला आहे. कार्यक्रमाचा परिसर संवाद, सद्भाव आणि मैत्रीच्या वातावरणाने उजळून निघाला होता यानिमित्ताने धस फडणवीस घटस्नेहबंध पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याचे समोर आले आहे.

# विशेष पोलिस महानिरीक्षकांचे जालना भेटीवेळी गुन्हेआढावा बैठक

## गुन्हे नियंत्रण पोलिसांची कार्यक्षमता आणि जनसुरक्षा यावर दिला भर



फारुक शेख :- जालना दि.१२ डिसेंबर २०२५ छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक मा.श्री. वीरेंद्र मिश्रा यांनी आज जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात घेतलेल्या गुन्हे आढावा बैठकीत जिल्ह्यातील गुन्हेगारी नियंत्रण, तपासाची गती गावांमध्ये सिसिटीव्हीकरण तसेच जनसुरक्षेला प्राधान्य देण्याचे स्पष्ट निर्देश दिले.जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी सर्व पोलिस ठाणे प्रभारी व शाखा प्रमुख या बैठकीस उपस्थित होते.

पोलिसांची उत्कृष्ट कामगिरी खत्रझ्झ कडून गौरव मागील महिन्यात नोव्हेंबर २०२५ गुन्हे उकलण्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलिस अधिकारी व अंमलदारांचा विशेष सत्कार करून त्यांचे कौतुक करण्यात आले. यामध्ये लुटमार,दरोडे,जबरी चोरी,घरफोड्या,वाहनचोरी, चेनस्नॅचिंग आणि इतर गंभीर गुन्ह्यांचा जलद उलगडा करून गुन्हेगारांना गजाआड करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विशेष गौरव झाला. जालना पोलिसांना १.५७ कोटींचे अत्याधुनिक साहित्य विशेष खत्रझ्झ यांनी गुन्हे अन्वेषणासाठी आवश्यक असलेले अत्याधुनिक साहित्य जालना पोलिसांना उपलब्ध करून दिले.यात समावेश ६० नवीन मिनी कम्प्यूटर, ६० प्रिंटर,१० आधुनिक लॅपटॉप, हे सर्व साहित्य पोलिस ठाणे व उपविभागीय कार्यालयांत वाटप करण्यात आले. गुन्हे अन्वेषण आणि दैनंदिन कामकाजाची गुणवत्ता आणि वेग वाढविण्यासाठी ही महत्त्वपूर्ण मदत ठरेल असे खत्रझ्झ मिश्रा यांनी स्पष्ट केले. गुन्हेगारांना कोणतीही सवलत नाही खत्रझ्झ मिश्रा बैठकीत बोलताना खत्रझ्झ मिश्रा म्हणाले गंभीर गुन्ह्यांचा तपास तातडीने पूर्ण करा लुट,घरफोडी,चोरी,दरोडे, वाहनचोरी यांसारखे गुन्हे तातडीने उकलून दोषींवर कठोर कारवाई करा.जास्तीत जास्त वेळ क्षेत्रात राहण्याचे आदेश सर्व उपविभागीय अधिकारी आणि ठाणे प्रभारी यांना नागरिकांशी प्रत्यक्ष संपर्क वाढविण्याचे निर्देश. प्रत्येक गावात सिसिटीव्ही कॅमेरे लावण्यावर भर गुन्हे प्रतिबंधासाठी अभियान राबवून गावागावात उउढत बसविण्यासाठी पुढाकार घेण्याचे आदेश.बालकांविरोधातील गुन्हे रोखण्यासाठी विशेष पथक

ऑनलाइन गुन्हे महिलांविरोधातील गुन्हे आणि बालसुरक्षा विषयक प्रकरणे प्राधान्याने हाताळण्याचे निर्देश. प्रशासनाचे कार्य जनतेपर्यंत पोहोचावे खत्रझ्झ पोलिसांनी संवेदनशीलता संयम आणि तत्परता ठेवून नागरिकांशी संवाद वाढवून जनविश्वास अधिक दृढ करावा असेही त्यांनी सांगितले. तसेच आगामी काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सर्व विभागांनी संयुक्तपणे कार्य करावे असे निर्देश दिले.

# गुरुकुल पब्लिक स्कूलचा खेळाडू पृथ्वीराज गिरीची नेट बॉलच्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड




बीड ।प्रतिनिधी

संगमनेर येथे नेट बॉलच्या १७ वर्षा खालील मुले व मुली राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न झाल्या. या राज्यस्तरीय स्पर्धा क्रीडा युवा सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आल्या. या स्पर्धेच्या ठिकाणी घेण्यात आलेल्या राज्यस्तर निवडचाचणी मध्ये गुरुकुल पब्लिक स्कूलचा खेळाडू पृथ्वीराज गिरी यांनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत महाराष्ट्र नेटबॉल संघामध्ये आपले स्थान निश्चित केले.

पृथ्वीराज गिरी हा खेळाडू मागील तीन वर्षापासून नेट बॉलचे प्रशिक्षण जिल्हा क्रीडा संकुल बीड येथील मैदानावर घेत आहे. आता या नेट बॉलच्या राष्ट्रीय राष्ट्रीय स्पर्धा राजस्थान येथे ८ ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान होणार आहेत. या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये पृथ्वीराज गिरी हा गुरुकुल पब्लिक स्कूलचा खेळाडू महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. ज्या खेळाडूला गुरुकुल इंग्लिश स्कूलचे क्रीडा प्रशिक्षक रोहित ढवळे व मीरा काशीद यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या अध्यक्षा डॉ. विनिता ढाकणे, सचिव डॉ. राजेंद्र ढाकणे, कार्यकारी संचालक अखिलेश ढाकणे प्राचार्य ऋतुजा गाडीवान, उपप्राचार्य, क्रीडा प्रशिक्षक रोहित ढवळे, मीरा काशीद तसेच अन्य प्रशिक्षक व पालकांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# योजना शिक्षणाधिकारीपदाचा पदभार डॉ.किरण कुंवर यांनी स्वीकारला

**बीड ।प्रतिनिधी**

**धुळे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी डॉ.किरण कुंवर यांनी शुक्रवार दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारला. शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळख असलेल्या डॉ. किरण कुंवर यांच्याकडे बीड जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांनी रिक्त असलेल्या महत्वपूर्ण प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार देऊन या विभागाला शिस्त आणावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**

**शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी रिक्त असलेल्या प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाचा पदभार शिस्तप्रिय अधिकारी डॉ. कुंवर यांना सीईओ यांनी द्यावा..?**




महाराष्ट्र शासनाने दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी किरण कुंवर यांच्या बदलीचे आदेश निर्गमित केले होते. शुक्रवारी शिक्षणाधिकारी डॉ. कुंवर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांची भेट घेतली. यावेळी माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील उपस्थित होत्या.

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान हे प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. कुंवर यांच्याकडे देण्याची शक्यता आहे.

योजना शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले यांची लातूर येथे २१ जून २०२५ रोजी बदली झाल्यापासुन बीड येथील योजना शिक्षणाधिकारी पद रिक्त होते.शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांना अनुभवी, कार्यतत्पर आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळखले जाते. किरण कुंवर यांनी पदभार स्वीकारल्यामुळे जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्तावाढ आणि विविध शैक्षणिक उपक्रमांना गती येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



**हिमाचल प्रदेश - येथे काँग्रेसने सत्तेत येऊन तीन वर्षे यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल हिमाचल प्रदेश मंडी या ठिकाणी हिमाचल प्रदेश काँग्रेसच्या प्रभारी खा.सौ.रजनीताई पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुक्खू, प्रदेशाध्यक्ष विनयकुमार आदींच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी मान्यवर आणि हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.**



# जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्याकडून डॉ. संजय तांदळे सन्मानित

बीड ।प्रतिनिधी

राष्ट्रीय आयुष अभियान जिल्हा रुग्णालय यांच्या वतीने आयोजित भव्य मोफत आयुष रोग निदान उपचार शिबिरात सहभागाबद्दल व एड्स जागृती रॅली तील सहभागा बद्दल जिल्हा रुग्णालयाचे प्रमाणपत्र तसेच योगा क्षेत्रातील उत्तम कामगिरीबद्दल दिल्ली येथील आयुष मंत्रालयाचे प्रमाणपत्र जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत यांच्या हस्ते १२ डिसेंबर २०२५ रोजी आयुष विभागाचे सदस्य डॉ. संजय तांदळे यांनी स्वीकारले.

# यहाँ के हम सिंकदर,बीड मध्ये रंगणार विशेष मुलांचा कला महोत्सव

बीड ।प्रतिनिधी

बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्षा अॅड. निलमताई शिर्के सामंत यांच्या संकल्पनेतून विशेष (दिव्यांग) मुलांचा कला महोत्सवाचे आयोजन दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात येणार असल्याचे बीड जिल्हा बालरंभूमी परिषदेच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ. दिपाताई क्षीरसागर यांनी कळवले आहे.

या महोत्सवात विशेष मुलांच्या (दिव्यांग) शाळांचा सहभाग असणार आहे आणि दिव्यांग बालकलावंत यांचा सहभाग असणार आहे. दिव्यांग मुलांच्या कला कौशल्याला वाव देण्यासाठी बालरंगभुमी परिषदेने यहाँ के हम सिकंदर कला महोत्सवाच्या माध्यमातून विशेष दिव्यांग कलाकारांना सांस्कृतीक रंगमंच उपलब्ध करुन देणार आहे. १८ वर्षाखालील बाल कलाकारांद्वारे ऩत्य, चित्रकला, गायन, वादन यासारख्या कला सादर होणार आहेत. जास्तीत जास्त दिव्यांग शाळांनी यामध्ये सहभाग नोंदवावा. या महोत्सवाचे स्वरुप स्पर्धात्मक नसून महोत्सवामध्ये सहभागी सर्व शाळांना तीन हजार रुपये मानधन, सन्मानचिन्ह व सहभागी बालकलावंताना सहभाग प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांनी बनवलेल्या वस्तुचे प्रदर्शन व विक्रीचे आयोजनही करण्यात येणार असल्याचे प्राचार्य डॉ. दिपाताई क्षीरसागर यांनी कळवले आहे.या दिव्यांग कला महोत्सवात बालकलावंताचे कौतूक करुन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी उपस्थित रहावे. व विशेष मुलांनी बनवलेल्या वस्तु खरेदी करुन त्यांचा आनंद द्विगुनित करावा असे आवाहन अध्यक्ष निलमताई शिर्के सामंत , दिपाताई क्षीरसागर, राजु तुलालवार, अॅड शैलेश गोडमगुंडे, नंदकिशोर जुवेकर, यांगेश शुल्क,सतिष लोटके, डॉ. संजय पाटील देवळानकर, श्रीमती स्नेहलताई पाठक, विलास सोनवणे, नामदेव साळुंके, मिलींद शिवणीकर, अनुराधा चिंचोलकर, दिपक जमदाडे , दुष्यंता रामटेके, अनिल गाडे, बालासाहेब कांबळे, सुरेश साळुंके, विजय राख सर्व सदस्यांनी केले आहे.

# स्व.नानांकडून राष्ट्रभक्ती, त्याग आणि सेवा याची प्रेरणा घ्यावी - डॉ.सुभाष जोशी

## स्व.नाना पालकर यांनी समाज परिवर्तनाचे कार्य केले - बिपीनदादा क्षीरसागर

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

स्व.नानांनी राष्ट्रभक्ती, त्याग आणि सेवा शिकवली, याची आपण प्रेरणा घ्यावी असे आवाहन डॉ.सुभाष जोशी यांनी उद्घाटक म्हणून बोलताना केले. तर स्व.नाना पालकर यांनी समाज परिवर्तनाचे कार्य केले असे गौरवोद्गार बिपीन क्षीरसागर यांनी स्पर्धेच्या समारोप सत्रात काढले. येथील खोलेश्वर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित स्व.नाना पालकर स्मृती आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा शानदार समारोप गुरूवारी झाला. या स्पर्धेत नागपूर येथील संताजी महाविद्यालयाचा विद्यार्थी अनिकेत रामा वनारे हा प्रथम विजेता ठरला. या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा सांघिक फिरता चषक खोलेश्वर महाविद्याल, अंबाजोगाई यांना मिळाला. सदरील स्पर्धेत राज्याच्या विविध जिल्ह्यांतून ५२ स्पर्धक सहभागी झाले होते.

खोलेश्वर महाविद्यालयात गुरूवार, दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित स्व.नाना पालकर स्मृती आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य तर उद्घाटक म्हणून डॉ.सुभाष जोशी (अध्यक्ष - पूर्णवादी नागरी सहकारी बँक, बीड.) हे होते तर व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक जयप्रकाश तोष्णीवाल, प्रमुख अतिथी युवा नेते अक्षय मुंदडा, भा.शि.प्र.संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा.चंद्रकांत मुळे, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे, कार्यवाह किरण कोदरकर, महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य विष्णुपंत कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.दीपक फुलारी आदींची उपस्थिती होती. यावेळी उद्घाटक डॉ.सुभाष जोशी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, या स्पर्धेचा मी सुरूवातीला स्पर्धक होतो. आज उद्घाटक म्हणून मला बोलावून आपण जो सन्मान केला त्याबद्दल आभार व्यक्त करतो. वक्ता निर्माण करणारी ही वक्तृत्व स्पर्धा आहे. स्पर्धकांनी अभ्यास करावा म्हणजे वक्तृत्व कसे असते हे सर्वांना समजेल स्व.नाना पालकरांसह अनेक चरित्र ग्रंथ विद्यार्थी स्पर्धकांनी अभ्यासावेत, कमी वेळेत अर्थपूर्ण बोलणे वक्तृत्व कलेचे वैशिष्ट्य आहे. या वक्तृत्व स्पर्धेमध्ये खूप चांगले विषय आहेत. स्व.नानांनी राष्ट्रभक्ती, त्याग आणि सेवा शिकवली आहे. याची आपण सर्वांनी प्रेरणा घ्यावी असेही आवाहन डॉ.जोशी यांनी उपस्थितांना केले. तर प्रमुख अतिथी म्हणून बोलताना अक्षय मुंदडा म्हणाले की, स्पर्धा कोणत्याही क्षेत्रातील असो आयुष्यात वेळेचे व्यवस्थापन जमलं पाहिजे. मागील पन्नास वर्षांपासून ही स्पर्धा अविरत सुरू आहे. स्पर्धा सुरू करणे आणि टिकवणे हे अवघड



आहे. खऱ्या अर्थाने राज्यस्तरीय स्पर्धेत आत्मविश्वास आणि सामान्य ज्ञान वाढतं. तेव्हा विद्यार्थ्यांनी या स्पर्धेच्या निमित्ताने राष्ट्रभक्ती जोपासली पाहिजे व देशप्रेम जागे ठेवणे गरजेचे असल्याचे मुंदडा यांनी सांगितले. प्रास्ताविक करताना स्पर्धेचे संयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दीपक पुलारी यांनी स्व.नाना पालकर स्मृती अंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजना संदर्भात माहिती देताना सांगितले की, चारित्र्यसंपन्न, सामाजिक भान असलेली व राष्ट्रप्रेमी पिढी घडावी या उद्देशाने भा.शि.प्र.संस्थेची स्थापना झाली. अध्ययन व अध्यापनासोबतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी संस्थेतील शिक्षक सतत कार्यरत असतात. त्यांनी आलेल्या स्पर्धकांना स्व.नाना पालकरांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून दिली तसेच स्पर्धेत निवडलेल्या विषयांबद्दलही माहिती सांगितली. तर उद्घाटन सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांनी विचारांच्या आधारावर गेली ५५ वर्षे ही स्पर्धा आपण घेत आहोत. राष्ट्रीय विचारांवर ही संस्था स्थापन झाली आहे. राष्ट्र उभारून विकसित राष्ट्र वर्धिष्णू करायचा आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी स्व.नाना पालकर यांचा, त्याग आणि समर्पण वृत्ती घेतली पाहिजे, नानांनी जे विचार दिले. ते प्रेरणादायी आहेत. राष्ट्र उभारणीसाठी नानांनी त्याग शिकविला आज समाजामध्ये विभक्त कुटुंब पद्धती मोठ्या प्रमाणात होत आहे. आपली कुटुंब व्यवस्था सुदृढ असली पाहिजे यासाठी त्याग आणि समर्पण करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितलं. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी एनसीसी कॅडेट अग्निविरांचे अभिनंदन व स्वागत पालकांच्या उपस्थित करण्यात आले. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन प्रा.सतीश हिवरेकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार उपप्राचार्य डॉ.बिबीशन फड यांनी मानले. या स्पर्धेच्या समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी भा.शि.प्र.संस्थाध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर हे होते. तर व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह बिपिनदादा क्षीरसागर, शहर संचालक निवृत्ती दराडे, दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, केंद्रीय कार्यकारणी सदस्या डॉ.कल्पनाताई चौसाळकर, सौ.वर्षाताई मुंडे, विष्णू सोनवणे, नितीन चौधरी, खोलेश्वर सीबीएस स्कूल अध्यक्ष डॉ.गोपाळ चौसाळकर, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी, विष्णुपंत कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.दीपक फुलारी आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह बिपिनदादा क्षीरसागर यांनी सांगितले की, भा.शि.प्र.संस्था हा एक परिवार आहे. ५५ वर्षे सातत्याने चालणाऱ्या स्पर्धेचे कौतुक करून विद्यार्थ्यांत वक्तृत्व गुणाचा विकास व्हावा, प्रत्येक क्षेत्रात राष्ट्रप्रेमी नागरिक घडविणारी ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. स्व.नाना हे समाज परिवर्तनाचे काम करीत होते. म्हणून मोठ्या व्यक्तीचे स्मरण करण्याची ही स्पर्धा आहे. स्व.नाना पालकर यांच्या चरित्राचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा असेही आवाहन क्षीरसागर यांनी केलं. याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर संचालक निवृत्ती दराडे, दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, ॲड.राजेश्वर देशमुख यांनी ही आपले समायोचित विचार मांडले. तर संस्थाध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर यांनी अध्यक्षीय समारोप करताना सांगितले की, स्व.नाना पालकर यांनी आपलं आयुष्य चंदनाच्या खोडासारखं झिजवलं, अनेक पद्य ग्रंथ लिहिले अशा व्यक्तींच्या स्मरणार्थ आयोजित केलेली ही आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. वक्तृत्व ही एक कला आहे. तुम्ही कसे वागता, तुम्ही कसे बोलता, त्या शब्दांना अर्थ मिळतो. वजन मिळते.

# तहसीलदारांच्या बनावट सही प्रकरणी तत्कालीन नायब तहसीलदारविरुद्ध गुन्हा दाखल

केज ।प्रतिनिधी

केज तहसील प्रशासनाला हादरवून सोडणारी धक्कादायक घटना उघड झाली आहे. तहसीलदारांच्या बनावट सह्या करून अर्धन्यायिक प्रकरणाचा आदेश पारित केल्याप्रकरणी तत्कालीन नायब तहसीलदार आशा वाघ-गायकवाड यांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार केजपोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून महसूल विभागात प्रचंड खळबळ माजली आहे.




महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १५५ अंतर्गत अर्धन्यायिक अधिकार केवळ तहसीलदारांकडे असतात.मात्र संबंधित प्रकरणात तत्कालीन नायब तहसीलदारांनी तहसीलदारांचे अधिकार स्वतःहून वापरून आदेश दिल्याचे गंभीर प्रकरण समोर आले आहे.त्या सोबतच आदेशावर तहसीलदारांच्या नावाने बनावट स्वाक्षरी करून ती ग्राम महसूल कार्यालय तसेच तलाठीकार्यालयास पाठविल्याचेही चौकशीत स्पष्ट झाले.ही बाब उघड झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने तातडीने सखोल तपासाचे आदेश दिले.तपासात आदेशा तील सही बनावट असल्याची पुष्टी झाली असून आदेश पारित करण्याची प्रक्रिया पूर्णतः बेकायदेशीर व नियमबाह्य असल्याचेही निष्पन्नझाले. या बनावट आदेशामुळे शेतकऱ्यांची दिशाभूल झाली तसेच महसूल अधिकारी व तलाठी यांच्या कामकाजावरही प्रतिकूल परिणाम झाल्याचे समोर आले आहे.सदरील प्रकरणात फसवणूक,सरकारी कागदपत्रांची बनावट निर्मिती,पदाचा गैरवापर अशा अनेक गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवली जाण्याची शक्यता असून या प्रकरणामुळे केवळ केज तालुकाच नव्हे तर छत्रपती संभाजीनगर महसूल विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयातही खळबळ उडाली आहे.अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यामुळे महसूलविभागा तील अधिकाऱ्यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून दस्तऐवज पडताळणी प्रक्रिया अधिक कडक करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. स्थानिक पातळीवर या प्रकरणाची जोरदार चर्चा असून संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाईची जनतेतून मागणी होत आहे.

# केज तहसील कार्यालय समोर सुरू असलेले अमरण उपोषण अखेर मागे

## प्रशासनाच्या आदेशानुसार पुढील मोजणी १२ जानेवारी रोजी

केज: प्रतिनिधी
(दै. महाभारत)

केज येथील सर्वेक्षण क्रमांक ३०/१ व ३०/२ या जमिनीच्या ताबा व चतु:सीमा निश्चितीच्या मागणीसाठी ९ डिसेंबर २०२५ पासून तहसील कार्यालयासमोर अमरण उपोषणास बसलेल्या श्रीमतीशांताबाई श्रीमंत लांडगे,सोजर उमेश ताटे,विष्णू श्रीमंत लांडगे या उपोषण कर्त्याने आपले उपोषण मागे घेतले आहे. तहसील प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या अधिकृत पत्रांमधून सदर माहिती समोर आली आहे.

प्रकरणात संबंधित जमिनीवर अनेक सहखातेदार असून जमीन पडीत अवस्थेत असल्यामुळे ताबा पावती, पंचनामा व जमीन वाटपाच्या मूळ



कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी प्रशासनिक प्रक्रिया अपेक्षेपेक्षा अधिक वेळ घेणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. जमीन वाटपाचा कालावधी जुना असल्याने दाखले शोधण्यास अतिरिक्त वेळ लागणार असल्याचे उपअधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, केज यांनी कळविले आहे.

त्यांच्या पत्रानुसार पुढील अधिकृत मोजणीची तारीख १२ जानेवारी २०२६ निश्चित करण्यात आली आहे. त्या दिवशी संबंधित मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी उपस्थित राहून सीमांकन दाखविण्यास आदेशित करण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर तहसीलदार केज यांनी दिलेल्या, कालावधी नुसार चतु:सीमा निश्चिती प्रक्रियेला गती देण्यासाठी उपोषण थांबवून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. प्रशासनाने पुढील एक महिन्यात कागदपत्रांचा शोध व पुढील कार्यवाही पूर्ण करण्याची हमी दिल्यानंतर उपोषणकर्त्याने आपले अमरण उपोषण मागे घेतल्याची माहिती मिळाली आहे.

या निर्णयामुळे जमिनीच्या ताबा प्रकरणातील पुढील कार्यवाहीचे मार्ग सुकर होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.